म. ग्रं. सं. ठाणें

विषय निबंध

लेखक कृष्णराव भास्करजी रेके

सन १८८०

संग्रहालय क्रमांक २४ ७०४

पुस्तकाचें नांव सुबोध मालिनी

२४

संक्र.

सुबोध मालिनी.

निबंध

सुबोधमालिनी.

हें पुस्तक

कृष्णराव भास्करजी रेळे.

यांनीं

दीर्घ प्रयत्नानें

अनेक ग्रंथांच्या आधारावरून रचून

तयार केलें,

तें

मुंबई येथें

"न्याशनल" छापखान्यांत छापविलें.

सर्व प्रकारचे हक्क मालकानें आपणाकडेस ठेविले आहेत.

शके १८०१.

ज्यानुआरी सन १८८०.

किंमत दाहा आणे.

अनुक्रमणिका.

सर म्याथ्युहेल याचें आपल्या मुलांस बोधाचें पत्र. ७
आईचें लाड व मुलांचे हाल. १५
आपलीं कर्तव्यें व तीं बजावल्यापासून योग्यता. १९
उद्योग. २२
सुख म्हणजे काय व तें कशानें प्राप्त होतें. २९
विवाह. ३१
स्त्रीशिक्षण. ३६
स्त्रियांस मानसन्मान. ३९
नवऱ्यानें बायकोस कसें बागवावें ह्या विषयीं नियम. ४४
बायकोचें नवऱ्याशी वर्तन व त्या विषयीं नियम. ४५
परस्त्रीचा मार्ग नाशाकडे. ४७
पोकळ सुख ४७
तंबाखू पासून वाईट परिणाम ५३
रोग्यांच्या व्यवस्थेविषयीं विचार. ५९
कुटुंब वैद्य. ६१
मनुष्याचा अस्थिपंजर व त्याच्या रचनेची तुलना. ६४
पाचनक्रियेस लागणारा काळ. ७५
स्वच्छता. ७९
पैशाचा उपयोग. ८३
काटकसरीनें वर्तणें ८५
दारू पिण्यापासून वाईट परिणाम. ८६
देहात्मवाद. ८८
विश्वास. ९१
उन्मत्तपणा. ९६
आज्ञा. १००
परमेश्वराची प्रार्थना. १०१

प्रस्तावना.

आपल्या ह्या महाराष्ट्र भाषेंत आजपर्यंत बरींच पुस्तकें झालीं आहेत व होतही आहेत. आणि अलिकडे विद्वान् जनांनीं या कामाकडे बरेंच लक्ष पोहोंचविलें आहे. ह्मणजे आपल्या बुद्ध्यनुसार कोणीं भाषांतरें. कोणीं स्वकपोलकल्पित कादंबऱ्या, कोणीं नाटकें अशीं बरींच गद्यपद्यात्मक पुस्तकें तयार केलीं व कोणीं करीत आहेत. हें पाहून. मला परमानंद होत आहे. आणि ह्मणून मीही हें पुस्तक उपदेशपर अनेक मोठमोठाले इंग्रेजी व मराठी ग्रंथ वाचून त्याच्या आधारानें रचून आमच्या प्रिय विद्वज्जनांपुढें सादर केलें आहे.

साधारणतः मनुष्याचा स्वाभाविक कल असा असतो कीं, त्यास निरंतर सुख पाहिजे आणि तें व्हावें ह्मणून तो नानातऱ्हेचे उपायही करीत असतो; परंतु खरें सुख ह्मणजे काय व तें कशानें प्राप्त होतें ह्याविषयीं विचार

नि. २४

त्याच्या ध्यानीं मनीं ही नसतात ही मोठी दुःखाची गोष्ट होय.

प्रत्येक मनुष्यानें खावें, प्यावें, आणि आपल्या सर्व उद्योगांचें फल भोगावें हें देवाचें देणें आहें, आणि त्यानेंच मनुष्यास सुख संपादन करण्याची साधनें दिलीं आहेत, त्यांत पाहिलें साधन हेंचकीं, त्यास कुटुंबपरिवार दिला आहे. आणि हें वास्तविक आहे कीं, ज्या मनुष्यास कोणत्याही खऱ्या सुखाची ओळख झाली म्हणजे त्यास कुटुंबपरिवारापासून नानातऱ्हेचीं सुखें प्राप्त होतात परंतु ज्यास मुळींच खऱ्या सुखाची ओळख सुद्धां नाहीं त्यास त्याच कुटुंबापासून नानातऱ्हेचीं दुःखें भोगावीं लागतात. याकरीतां प्रत्येक कुटुंबी मनुष्यानें कुटुंबपरिवार वागविण्याची विद्या शिकावी हें योग्य आहे. तसें न केलें तर त्याच्या कुटुंबांत कांहीं विघ्नें, तंटे बखेडे व मारहाण हीं सदोदित रहातील.

सांप्रत आमच्या लोकांची अशी कांहीं वाईट रीति होऊन गेली आहे कीं, ती सांगावयास सुद्धां दुःख वाटतें. पहा, नवरा बायको आपापल्यामध्यें भांडण करितात मारहाण करितात. एकमेकांचा अपमान करितात, शेवटीं असेंही करतात कीं, कुटुंबापासून निराळे होऊन कुटुंबांत बेबनाव करितात ही किती दुःखाची गोष्ट आहे बरें? असें होण्याचें कारण हेंच कीं त्याच्या कुटुंबांत एकी नसते, स्त्रियांस शिक्षण नसतें त्यांना मानसन्मान मिळत नसतो, आणि नवऱ्यानें बायकोस कसें वागवावें व बायकोचें नवऱ्याशीं वर्तन कसें असावें हेंही माहीत नसतें.

प्रिय बांधवजनहो, आपल्या लोकांची कशी स्थिति होऊन गेली आहे त्याजकडे आपण सर्वांनीं अवश्य लक्ष पुरविलें पाहिजे आणि आपणांस दुःखाच्या परजांतून निघून सुखाच्या घरांत राहिलें पाहिजे. यास्तव हा ग्रंथ मी अल्प मतीनें उपदेशपर रचून तयार केला आहे तर या लहान ग्रंथास ईश्वर आशीर्वाद देवो आणि हा ग्रंथ सर्वांच्या

उपयोगी पडो व तेणें करून सर्व लोकांनीं ईश्वराजवळ सदा सर्वकाळ प्रार्थना करावी अशी माझी ईश्वराजवळ विनंति आहे.

कृ. भा. रेळे.

K. B. RELE.

compiler

विशेष सूचना. — या पुस्तकांत बरेच ठिकाणीं माझ्या अविद्वत्तेमुळें चुका राहिल्या असतील, व छापते वेळीं ही काना मात्रा अनुस्वारादि अपभ्रंश पुष्कळ झाले असतील ह्मणून विद्वज्जन, माझ्या अज्ञानमयजलाचा त्याग करून किंचित् असलेल्या गुणमय दुधाचाच स्वीकार करतील अशी मी आशा करतों.

आर्या

न्यूनें यांत बहूतची सांपडतिल हो पदोपदीआतां ।
वागवुनीक्षापरि मज ममतेनें वागवी जशी माता. ॥ १ ।
विद्वज्जनहो मिळुनी करा करा मजवरी कृपावृष्टी ।
ज्यंगें वाहुनि न्या परि सुफलितमजवरअसोसदा दृष्टी ॥२॥

कृ. भा. रेळे.

K. B. RELE.

compiler

भग्न पृष्ट कटि ग्रीव स्तब्ध दृष्टि रेषामुखम्
कष्टेन लिखितं ग्रंथ यत्नेन प्रतिपालयेत्

बेलि १२०
का

सुबोधमालिनी.

सर म्याथ्युहेल याचें आपल्या मुलांस बोधाचें पत्र.

समहालय
नं
ठाणें सन १८९

सर म्याथ्युहेल ह्या नांवाचा एक उत्तम विद्वान् (खिस्ती) न्यायाधीश ग्रेट ब्रिटन देशामध्यें होऊन गेला. त्याच्या योग्यतेचे पुरुष ह्या जगांत आजपर्यंत फारच थोडे झाले असतील. ज्यास निष्पक्षपात ह्मणतात, तो गुण ह्या महापुरुषामध्यें पूर्णपणें वास करीत असे. ह्याचें साधारण भाषणही अत्यंत बोधपर असे. ह्याचे ग्रंथ जो लक्षपूर्वक वाचील त्याच्या अंतःकरणांत नीतिप्रभेचा प्रकाश पडल्यावाचून राहाणार नाहीं. ह्यानें इ० स० १६६२ च्या सुमारास आपल्या मुलांस एक पत्र लिहिलें आहे तें अगदीं साधारण व्यावहारिक विषयांवर लिहिलेलें आहे. त्याचें तात्पर्य मासल्याकरितां येथें लिहितों.

" प्रिय बालकांनो, मी आज सायंकाळीं पांच वाजतां फारिंगतन येथें सुखरूप येऊन पोहोंचलों, याबद्दल मी जगदीश्वराचे फार फार आभार मानितों. आज मला येथें थोडासा रिकामा वेळ आहे, त्याचा उपयोग असा व्हावा कीं, त्याच्या योगानें माझ्या अंतःकरणास समाधान वाटून तुमचेंही हित व्हावें असें मी इच्छितों, ह्मणून मीं जो तुह्मांस लेखनद्वारा थोडासा बोध करीत आहें त्याकडे

तुसचें लक्ष असावें. कारण हा बोध तुमचें कल्याण होण्या-विषयींचा आहे. हा विषय शोधून काढण्याचा आशय इतकाच कीं, इहलोकीं मनुष्यास ह्या जिव्हेच्या योगानें अनेक बऱ्या वाईट गोष्टी व अनेक सुखदुःखें प्राप्त होत असतात. पुनः मला जेव्हां फुरसत होईल तेव्हां मी तुह्मांस इतर विषयांसंबंधी लेखनद्वारें बोध करीन."

१ " जें तुह्मांस, हें असत्य आहे असें माहीत आहे, तें खरें आहे ह्मणून कोणाजवळ प्रतिपादन करूं नका. असत्य बोलणें हें महत् पाप आहे, तें ईश्वरास अगदीं दुष्ट वाटतें, कारण त्यानें ही जिव्हा आपणास सत्य बोलण्यासाठीं दिली आहे. असत्य बोलण्यास दिली नाहीं. असत्य भाषण हें केवळ मानवस्थितीस अगदीं अयोग्य आहे; कारण, खरेपणा पटला नाहीं ह्मणजे कोणाचा कोणावर भरंवसा नसल्यानें परस्पर स्नेह व्हावयाचा नाहीं. असत्य भाषणानें मनुष्याची मोठी हानि होते, ती अशी कीं, अगोदर स्वतः त्याजकडे नीचत्व येतें. शिवाय त्यानें त्याचे मन इतकें विघडून जातें कीं, पुढें त्यास बरें बोलण्याची इच्छाच होत नाहीं अथवा खोटें बोलल्यावांचून त्याच्यानें रहावत नाहीं. मग तें सयुक्तिक असो किंवा अयुक्तिक असो. शेवटीं त्याचा परिणाम असा होतो कीं, तो खरें बोलला तरी लोक त्यावर विश्वास ठेवीत नाहींत आणि मी खोटें बोलतों केव्हां ह्याचें त्यास भानही रहात नाहीं.

२ " खोटें न बोलण्याविषयीं जपलें पाहिजे, तसेंच आपलें बोलणें कधीं खोटें पडण्याचा प्रसंग न येईल अशाबद्दल फार जपलें पाहिजे. ह्मणजे जी गोष्ट नुस्ती उडत उडत ऐकिली किंवा दुसऱ्याच्या सांगण्यावरून समजली, अथवा अटकळावरून खरीशी भासली ती खरी आहे अशी समजून ती दुसऱ्यास कळवूं नये.

३ " थोडें बोलणें, आणि विशेषेंकरून आपल्या वरिष्ठांशीं अथवा परक्या गृहस्थांशीं बोलणें तें फार कमी बोलावें. फार वाचाळपणा केल्यानें आपली अक्कल तेव्हांच कळून येते आणि आपण बोलूं लागलों ह्मणजे अर्थांतच इतरांस मौन धरावें लागतें. आणि ते उगाच बसले ह्मणजे त्यांच्या भाषणापासून जें आपणास ज्ञान व्हावयाचें व जो अनुभव प्राप्त व्हावयाचा तो बुडवून आपली हानि आपण करून घेतली असें होतें. हें लक्षांत ठेवावें.

४ " बोलतांना डौलानें उडी घालूं नका, मोठ्यानें ओरडूं नका, अथवा तरफदारी दाखवूं नका. विचारानें मत खंडन करून प्रतिपक्षास निरुत्तर करा, उगाच गोंगाट करून त्यास चूप बसावयास लावूं नका.

५ " दुसऱ्याचें भाषण चाललें असतां मध्येंच बोलूं नका. त्याचें पुरतें ऐकून घ्या, ह्मणजे तें तुह्मांला बरोबर समजेल आणि त्याचें उत्तर तुह्मांला बरोबर देतां येईल.

६ " कामकाजासंबंधी बोलणें तें फार विचारपूर्वक बोला. जे शब्द आपण बोलणार त्यांचा अर्थ काय होईल हें प्रथम मनांत आणा. जें बोलाल त्याचा अर्थ स्पष्ट समजण्यासारिखें, शहाणपणाचें, आणि कोणाच्या मनास न लागे असें बोला. अविचारी पुरुष बोलण्याच्या पूर्वी विचार करीत नाहींत, ह्मणजे ते बोलून जातात आणि मग त्याचा विचार करूं लागतात.

७ " कोणी लोक शेतकींत हुशार असतात, कोणी बागबगीचा करण्यांत हुशार असतात, कोणी गणितांत

हुशार असतास, तसे कोणी संभाषण करण्यांतहीं प्रवीण असतात. कोणत्या बोलण्यामध्यें काय विशेष खुबी आहे हें लक्षपूर्वक पहावें, तें असें. त्याला कोणत्या तरी एका विषयावर बोलायास लावावें, तो काय ह्मणतो तें लक्षांत ठेवावें अथवा टिपून ठेवावें. असें केल्यानें त्या भाषणाची योग्यता समजून तुह्मांस तें प्राप्त होईल. आणि मग अनेक प्रसंगीं तें तुमच्या उपयोगी पडेल.

८ " हलक्या मनाचा व मूर्ख अशा मनुष्याची गांठ पडली असतां त्याच्या वैगुण्याकडे लक्ष द्यावें; आणि तें मनांत धरून त्याच्याशीं बोलावें व मनांत बागवावें ह्मणजे जे दुर्गुण त्याचे ठायीं आढळतील व जीं दुष्कर्में तो करीत असेल त्या दुर्गुणांचें व त्या दुष्कर्मांचें वारें आपणाकडे न येईल अशी आपण सावधगिरी ठेवावी.

९ " जो मनुष्य इमानी, शहाजोग, आणि वजनदार आहे अशा विषयींची तुमची खात्री नसेल तर जें तो सांगेल तें सर्व खरें आहे असें तुह्मी स्वतः समजूं नका. तो ओळखीचा असल्या खेरीज तुह्मी तशा प्रकारच्या मनुष्याचें खंडन करण्याची जलदी करूं नका. जर त्याविषयीं आपलें मत तुह्मांस द्यावेंच लागलें तर तें फार सावधगिरीनें, बेतबातानें आणि सभ्य रीतीनें द्या. भाषणांत उद्धटपणा किंवा दांडगेपणा हा अगदीं असूं नये. अशा रीतीनें बोलले असतां त्याचा कोणाला राग यावयाचा नाहीं, आणि तुह्मी हलक्या कानांचे आहां असें कोणी समजणार नाहीं.

१० " ज्या मनुष्यांच्या इमानोरणाविषयीं तुमची चांगली खात्री नाहीं, व ज्यांचें मन शुद्ध आहे असें तुह्मांला वाटत नाहीं, त्यांनीं जरी कितीही तुमच्या पुढें केलें, तरी

१८ " हा बोध नित्य वाचा, गंभीरपणें त्याचा विचार करा, आणि त्याप्रमाणें लक्षपूर्वक वागा. संभाषण करण्यास हा बोध फार उपयोगी आहे. असें तुमच्या अनुभवास येईल, तुमची सदसद्विचारशक्ति, ज्ञान, आणि अनुभव हीं जसजशीं वाढतील, तसतसा ह्या बोधाचा उपयोग अधिकाधिक तुमच्या मनांत बिंबेल.

आतां मला आणखी लिहिण्यास वेळ नाहीं. परंतु येथें एवढेंच सांगतों कीं एथपर्यंत मीं जो बोध केला आहे तो विसरूं नका. सकाळीं व संध्याकाळीं घरीं ईश्वराची प्रार्थना करा. लक्ष देऊन शांत चित्तानें धर्मशास्त्र वाचीत जा. कांहीं उपयुक्त उद्योग करा, कारण आळस हें मूर्खत्वाचें आणि पातकाचें मूळ होय. एकमेकांवर प्रेमता करा. गुरूंचा सन्मान राखा. माझ्या सेवकांस कडक रीतीनें वागवूं नका, आणि कठोर भाषणानें दुखऊं नका. सर्वांना मान ठेवा. माझें वियोगदुःख मनांत न आणितां शांत चित्तानें आणि आनंदानें कालक्षेप करा. तुह्मी जसे काय माझ्या समोर आहां असें समजून निरंतर सदाचरणानें वागा. असें लक्षांत ठेवा कीं, मजपेक्षां दुसरा मोठा तुह्मांस पिता आहे, त्याची नजर सदासर्वदा तुह्मांवर असते, तो तुमची अंतःकरणें जाणतो, आणि तुमचे विचारहीं समजतो, ज्या कोणाचे उपकार तुह्मांवर शील असतील त्यांस अनुलक्षून जीं तुमचीं कर्तव्यकर्में असतील तीं करा, त्यांचा मान राखा, आणि त्यांच्या आज्ञा पाळा. अशा प्रकारानें त्यांचे उतराई व्हा. असे उतराई होण्याचे प्रसंग तुह्मांस आले तर आपलें ऋण फेडण्यास आपणांस सामर्थ्य आलें असें समजा, आणि इमानें इतबारें लक्षपूर्वक श्रम

करून या प्रसंगाचें सार्थक करा. खर्च फार बेतबातानें करीत जा. परंतु कुटुंबांत कोणालाही आवश्यक गोष्टीची वाण ठेवूं नका. होईल तितक्या सवडीनें आनाथांस साहाय्य करा.

१९ " परमेश्वराच्या कृपेचें स्मरण, त्याचें भय आणि त्याची भक्ति हीं जागृत असावीं, आणि त्याची सेवा केल्याच्या योगानें जे लाभ व सुखें प्राप्त होतात तीं तुम्हीं समजावीं, तसेंच तुम्हांला त्यानें आशीर्वाद द्यावा, त्याचें सर्व साक्षित्व निरंतर तुम्हीं लक्षांत ठेवावें, या साठीं मी परमेश्वराची अहोरात्र प्रार्थना करून हें मागणें मागतों. लोभ असावा हे आशीर्वाद."

हें **सरम्याथ्युहेल** ह्याचें पत्र होय. ह्या पुरुषाचें अंतःकरण किती धर्मशील, किती भक्तियुक्त, किती सरळ, किती रसिक आणि आपल्या मुलांच्या पारमार्थिक सुखाकरितां किती काळजी वहाणारें होतें हें त्याच्या पत्राच्या तात्पर्यावरून सहज दिसून येईल. ह्या पत्राच्या तात्पर्यानें तिराईत मनुष्यास देखील सुबोध होतो, मग त्याच्या मुलांच्या अंतःकरणांत ज्ञानप्रकाश पडला असेल ह्यांत कांहीं नवल नाहीं आजपर्यंत आईबापांनीं आपल्या मुलांस हजारो पत्रें लिहिलीं असतील, पण ह्या पत्राच्या तोडीचीं त्यांत फारच थोडीं पत्रें असतील. मुलांस जमिनि जुमला करून ठेविला तर कालांतरानें लबाड लोक त्यांजपासून तो हिरावून घेतील. द्रव्य ठेविलें तर चोर चोरून नेतील; एका ह्या प्रकारची विद्या शिकविली तर कालगतीनें कदाचित् तीही विफळ होईल; परंतु अशा सुबोधाच्या योगानें आपल्या स्वतःच्या उदाहरणानें बालकांचीं अंतःकरणें

निर्मळ प्रेमळ आणि ईश्वरभक्तिपरायण अशीं करून ठेविलीं; आणि तीं त्यानीं जर तशींच राखिलीं, तर त्यापासून त्यांस ऐहिक आणि पारलौकिक ह्या दोनही प्रकारच्या सुखांचा लाभ होईल; ह्याहून बहुमोल वडिलोपार्जित धन तें मुलांनीं दुसरें कोणतें इच्छावें ?

आईचे लाड व मुलांचे हाल.

एका श्रीमंत गृहस्थाचे घरीं एक गरीब मोलकरीण होती. तिला एक तीन वर्षांचा मुलगा होता. तो, आई काम करीत असतां, नेहमीं तिच्या मागें मागें असे. एके वेळीं तो मुलगा आपल्या आईस पडवीमध्यें शिव्या देत होता, तें तिच्या धनिणीनें ऐकिलें तेव्हां ती तिला आंत बोलावून म्हणाली, " अग, तूं आपल्या मुलाला असें वाईट ग, कां बोलूं देतेस ? असें बोलणें मला आवडत नाहीं.

मोल०—बाईसाहेब, मीं काय करूं ?

धनी.—काय करूं म्हणजे ? त्याच्या पाठीवर एक काठी ओढ, आणि आपल्या आईबापांचा मान राखावा, अशी जी देवाची आज्ञा आहे ती त्याला शिकीव.

मोल.—बाईसाहेब, तो फार लहान आहे हो. त्याला मारायाला माझा हात पुढें होत नाहीं.

हें बोलणें इतकेंच राहिलें. तो मुलगा बाजारांतील मुलांशीं खेळूं लागला. त्याची कांहीं आगळीक दृष्टीस पडून त्याची आई त्यास बोलूं लागली कीं तो तिजपासून

पळून जातो अथवा तिला शिव्या द्यावयास लागतो हें कानीं आल्यावर ती धनीण तिला पुनः एकदां ह्मणली " तूं आपल्या मुलाला इतक्यांत जर ताळ्यावर आणून आपल्या आज्ञेंत वागविणार नाहींस, तर हा पुढें फार दुष्ट निपजेल बरें."

मोल.—बाईसाहेब तें सगळें खरें; पण तें एवढेंसें पोर त्याला मीं कसें काय करूं ?

तो मुलगा सात वर्षांचा झाल्यावर त्या धनिणीनें त्या मोलकरणीस पुनः ह्मटलें, " अग, तुझा मुलगा दिवसें दिवस फार द्वाड होत चालला आहे, हें पाहून मला खरोखर फार वाईट वाटतें. उद्यां त्याला मजकडे घेऊन ये; मीं त्याला ह्या आमच्या पंतोजीच्या स्वाधीन करून त्याला शिकवायाला सांगतें." मोलकरणीनें उत्तर केलें " बरें, बाईसाहेब."

दुसरे दिवशीं सकाळीं तिनें आपला मुलगा बरोबर आणिला नाहीं, असें पाहून तिला ती धनीण ह्मणाली, " अग, तुझा मुलगा कोठें आहे ?"

मो.—बाईसाहेब, आज त्याचे कपडे मळले होते ह्मणून मीं त्याला आणिलें नाहीं उद्यां खचीत आणीन.

दुसरे दिवशींही तिनें त्याला बरोबर आणलें नाहीं. तेव्हां ती धनीण तिला ह्मणाली, " अग, तुझा मुलगा कोठें आहे ?

मो.— त्याचा पाय दुखतो आहे, बाईसाहेब. ह्मणून तो आज आला नाहीं. तिसरे दिवशीं तिनें त्याचें डोकें दुखत आहे ह्मणून सांगितलें; चवथे दिवशीं दुसरीच सबब लाविली. असे सात आठ दिवस लोटले. तेव्हां शेवटीं

ती धनीण तीस रागावून ह्मणाली, " तूं आपल्या मुलास वाचायास शिकविण्याला मजकडे कां आणित नाहींस? हें जर तूं खरें खरें सांगणार नाहींस, तर मी तुला चाकरीवरून घालवून देईन. पहा "

ती मोलकरीण जरा भिऊन ह्मणाली, ', काय करावें बाईसाहेब, तो येत नाहीं."

धनीण.-येत नाहीं ह्मणजे ! त्याला पुढें घालून तूं घेऊन ये.

मोल.—बाईसाहेब, तो पण मला हात लावूं देईल तरना? तो मला मुळींच आटपत नाहीं.

धनीण.-हें पाहिलेंसना, कसें झालें तें. त्याला धाकांत ठेवण्याविषयीं मीं तुला मागें एकदां बोललें होत्यें, तेव्हां तूं ह्मणालिस तो फार लहान आहे, त्याला मारायाला माझा हात पुढें होत नाहीं, आणि आतां ह्मणतेस कीं तो फार मोठा झाला आहे, तो मला आटपत नाहीं. आतां त्या मुलास ताळ्यावर आणण्याचा वेळ गेला तो आतां फार वाईट मनुष्य होईल, ह्यांत कांहीं संशय नाहीं.

नंतर त्या धनिणीनें आपला शिपाई पाठवून, त्या मुलास उचलबांगडी करून धरून आणविलें, आणि पंतोजीच्या हवालीं केलें. त्यानें त्यास शिकविण्याविषयीं आपली पराकाष्ठा केली. पण तो त्याचें मुळींच ऐकेना. शेवटीं पंतोजीनें हात टेकिले. तेव्हां त्या धनिणीनें त्यास त्याच्या आईच्या स्वाधीन केलें.

तो मुलगा जसजसा मोठा होत गेला, तसतसे त्याचे दुर्गुण वाढत गेले. शेवटीं तो अट्टल चोर आणि अतिशयित द्वाड मनुष्य निपजला. त्याचा परिणाम असा

झाला कीं एकेवेळीं त्यानें आपल्या आईचे दागिने आणि जे थोडेसे रुपये तिनें पैसा पैसा करून जमविले होते ते चोरिले: आणि तीन चार सोबती बरोबर घेऊन तो एका होडींत बसून दूर कोठें जाऊं लागला, तेव्हां एकाएकीं तुफान होऊन ती होडी बुडाली आणि ते सगळे मरण पावले,

हें वर्तमान ऐकून त्या धनिणीस फार वाईट वाटले. तिनें त्या मोलकरणीची पुष्कळ समजूत घातली आणि तिला खाण्या पिण्यास कांहीं कमी पडूं दिलें नाहीं. परंतु त्या मुलाच्या मरणानें तिला एवढें दुःख झालें कीं त्याच्या धक्यानें ती हळू हळू पिचत जाऊन पुढें थोडक्याच दिवसां नीं मरण पावली. ती प्राण सोडते वेळीं धनिणीस म्हणाली, " बाईसाहेब, मीं त्याला लहानपणींच धाकांत ठेविलें असतें तर त्याची अशी दुर्दशा नहोती, आणि मजवर असा आज प्रसंग नये ता " हें तिचें बोलणें सर्व आईबापांनीं लक्षांत ठेवावें.

पुष्कळ बायका ह्या मोलकरणीप्रमाणें आपल्या मुलांशीं वागतात, आणि मग पश्चात्ताप पावतात. जर एक बाई काम करीत असतां, कडेवर घेण्याविषयीं तिचें मूल फार हट्ट धरून तिला आपल्या चिमकुल्या हातांनीं मारूं लागलें, आणि चांगलें बोलतां येईना तरी तसेंच शिव्या देऊं लागलें, तर तिनें त्याला लागलीच शिक्षा केली पाहिजे.

" हें फार लहान आहे, ह्याला कसें मारूं? " असें ह्मणून स्वस्थ बसूं नये. तें लहान आहे, तोंच त्यास ताळ्यावर आणण्याचा उत्तम प्रसंग आहे असें समजून तो फुकट जाऊं देऊं नये; आणि तेंच मोठें झालें, ह्मणजे त्यास आपले आज्ञेत ठेवणें फार कठीण पडतें हें लक्षांत ठेवावें.

मुलें लहान असतात तोंच त्यांस आपल्या आज्ञेप्रमाणें वागण्यास आईबापांनीं शिकविलें पाहिजे

" आपल्या पुत्रांस सन्मार्गास लावा. ह्मणजे ते तुमच्या अंतःकरणास संतोष देतील. " असें माझें सर्वांस विनयपूर्वक सांगणें आहे.

आपलीं कर्तव्यें व तीं बजावल्यापासून योग्यता.

या क्षणिक संसारांत निमग्न होऊन मानव आपलीं कर्तव्य कर्में विसरला तर त्याला मानव कसें ह्मणावें? संसारांत राहून परमार्थ साधणें हें आपलें मुख्य कर्तव्य होय. अरण्यांत जाऊन बसल्यानें फक्त आपलेंच हित आहे त्यांत परहित साधत नाहीं. आपण उन्नत होऊन दुसऱ्यास उन्नत करणें हेंच आपलें कर्तव्य असें प्रत्येक मानवानें लक्षांत ठेविलें पाहिजे.

दासबोधाच्या दाहव्या दशकांत रामदास स्वामीनीं यानमान व देहाची प्रशंसा केली आहे. तो नीट लक्ष्यपूर्वक वाचल्यावर नरदेहाची योग्यता किती आहे व ती कोणत्या कारणामुळें आहे हें आपणास समजून येईल. फक्त प्राण्यास नरदेह प्राप्त नाहीं, राजकुलांत उत्पन्न झाला इतक्यानेंच तो राजाधिकार चालविण्यास योग्य झाला

असें नाहीं, तर राजनीतीस अनुसरून राज्य करण्याचें त्याचे अंगीं सामर्थ्य आलें पाहिजे, तसेंच मानवाचे अंगीं जे अनेक उत्तम गुण अवश्य असावे ते असले तरच तो त्या नांवास शोभतो नाहीं तर तो मानव असून पशूच समजला पाहिजे

मानवास जें ज्ञान व जे सद्गुण त्याचे अंगीं असण्याची आवश्यकता आहे, त्याची प्राप्ति होण्यासाठीं सतत त्यानें लक्षपूर्वक उत्तम वस्तूचें अवलोकन केलें पाहिजे, क्रोध आणि दंभ यांचा स्पर्शही असले शरीरास होऊ देऊं नये परस्परांचें हित साधण्याकडे आणि स्वसुखाकडे चित्त दिलें पाहिजे, उत्तम मनुष्यांचीं चरित्रें पाहिलीं पाहिजेत उत्तम मनुष्यें कालक्रमण कोणत्या प्रकारें करितात याजकडे लक्ष पुरविलें पाहिजे, परपिडेपासून फारच दूर राहिलें पाहिजे, शांति आणि विवेक हीं नेहमीं आपले शरीरांत जागृत असलीं पाहिजेत परहिताकडे दुर्लक्ष करून जर आपली स्वतःचीच इच्छा पूर्ण केली, तर त्यांत आपल्यास फायदा होणार नाहीं. आपलें आचरण सन्मार्ग आणि सुनीति यांस अनुसरून असलें पाहिजे.

दुसऱ्यास त्रास देणें, त्याची हेळणा करणें, क्रोधाविष्ट होऊन अविचाराचीं कृत्यें करणें, व दुसऱ्याचें सुख अगर संपत्ति पाहून दुष्टभावानें त्याचें अनिष्ट चिंतणें, किंवा, त्याचा छळ करणें हीं मानवास सर्व थैव निंद्य आहेत, तसेंच करण्यानें त्या मनुष्याचें कांहीं अनहित न होतां उलटा आपला नीचपणा दिसून येतो आणि आपण निंदेस मात्र पात्र होतों. या जगांत आपण एकाच कुटुंबांतील सर्व लोक त्या कृपाघनाचीं लेकरें आहोंत, आणि दुसऱ्याचें हित

तेंच आपलें हित, व दुसऱ्याचें अनहित तेंच आपलें अनहित, असें समजून त्याप्रमाणें वर्तन ठेवणें हें आपलें मुख्य कर्तव्य आहे. फक्त तोंडानें बोलण्यांत कांहीं अर्थ नाहीं, आपण बोलतों तसें करूं तेथपर्यंत आपल्या हातून कांहींच होत नाहीं असें समजलें पाहिजे.

दुसऱ्याची सुधारणा करण्याचा प्रयत्न करण्यापूर्वी आपलें आचरण सुधारणें हें प्रत्येक मानवी व्यक्तीस आवश्यक आहे. नाहीं तर त्यापासून "लोकां सांगे ब्रह्मज्ञान, आपण कोरडा पाषाण" या प्रमाणें होणार. एखाद्या मनुष्यानें केलेलें कृत्य जरि आपल्या दृष्टीनें वाईट दिसलें तरि त्याबद्दल विचार करून अगर त्या मनुष्याकडून त्याबद्दल सरळ अंतःकरणानें खुलासा करवून घेऊन नंतर तें गैर आहे असें आपल्यास वाटलें, तर त्याचें मन न दुखवितां कळविलें पाहिजे, आपण पापाचा त्रास केला पाहिजे, परंतु प्राण्याचा त्रास करतां कामानये, कारण त्यास आपणास सुधारण्याची संधि व आशा असतेय, जर आपला कांहीं कोणीं अपराध केला तर त्याची क्षमा करणें हें आपणास उचित आहे. क्षमा हा मानवांत उत्तम गुण आहे आणि दया हें मानवास उत्तम भूषण आहे. या दोन अलंकारांवांचून मनुष्य शोभत नाहीं आपण जर क्षमा व दया हीं आपल्या बंधुजनांस दाखविलीं तर आपण ईश्वराचे क्षमेस व दयेस कसे पात्र होऊं हें आपण चांगलें लक्षांत ठेविलें पाहिजे.

उद्योग.

उद्योगः खलु कर्तव्यः फलं मार्जारवद्भवेत् ॥
जन्मप्रभृति गौर्नास्ति पयः पिबति नित्यशः ॥

याचा अर्थ–निश्चयें करून उद्योग करावा. उद्योगापासून माजरास जसें फल होतें तसें फल होईल, माजरापाशीं जन्मापासून गाय नसतां तें नित्य नित्य दूध पितें, हें त्याच्या उद्योगाचें फळ होय. ईश्वरानें मनुष्यास हात, पाय, डोळे इत्यादिक इंद्रियें दिलीं आहेत तीं उगीच स्तब्ध ठेवण्यासाठीं दिलीं नाहींत; कांहीं तरी उद्योग करावा ह्यासाठीं दिलीं आहेत.

उद्योगिनंपुरुषसिंहमुपैति लक्ष्मीः ॥
उद्योग्याचे घरीं, रिद्धी सिद्धी पाणी भरी ॥

तुह्मीं उद्योग मात्र करा, मग तुह्मांला कोणत्याहि गोष्टीची वाण पडणार नाहीं. उद्योग करावा हा मनुष्याचा मुख्य धर्म होय उद्योगावांचून कोणाचेंच कार्य सिद्ध होत नाहीं.

उच्च किंवा नीच, कोणत्याही अवस्थेंत मनुष्य असला तरी त्याचें उद्योगापासून कल्याण होतें, हुशार व मेहनती जे आहेत त्यांस देव आशीर्वाद देतो, आणि जे आळशी आहेत त्यांच्या मागें रोग, दुःख आणि दारिद्र्य हीं घोड्याप्रमाणें धांव मारितात. आळसानें मनुष्यास अडचणी प्राप्त होतात " टोळ आणि मुंग्या " यांची गोष्ट तुह्मीं वाचली असेल किंवा ऐकिली असेल. टोळानें आपलें अन्नसंग्रह करण्याचा जो काळ वसंत तो खेळण्यामध्यें घालविला

ह्मणून त्याला हिंवाळ्यांत कांहीं खावयास मिळेनासें झालें; परंतु मुंग्या पुढील दिवसांसाठीं आपल्या अन्नाचा संग्रह करून ठेवितात ह्मणून त्यांस सर्व काळ भरपूर खाण्यास मिळतें. आपल्या विपत्तिकाळीं एक टोळ मुंग्यांकडे जाऊन त्यांपाशीं खावयास मागूं लागला, त्यावेळीं त्यांपैकीं एकीनें टोळास कसें उत्तर केलें तें तुह्मांस ठाऊक असेलच. त्याप्रमाणें जीं मुलें आपल्या विद्याभ्यासाच्या दिवसांत विद्या किंवा कलाकौशल्य शिकतात तींच आपल्या उत्तर वयांत हर हुन्नरीनें आपला उदरनिर्वाह करितात. परंतु जीं मुलें टोळांप्रमाणें विद्याभ्यासाच्या दिवसांत छान छबल्या करून थयथया नाचतात तीं उत्तर वयांत खळखळां रडतात " व्याप्तीवांचून प्राप्ति नाहीं " आह्मीं उद्योग केला असतां या जगांतील सर्व चांगले लोक आह्मांवर प्रीति करतील नाहींतर करणार नाहींत, सारांश, या जगांत उद्योग हीच कामधेनु होय, ह्मणून लहान थोर मनुष्यांनीं उद्योग करीत असावें, हें आवश्यक आहे उद्योग हा आपला बंधु होय आणि आळस हा आपला शत्रु होय; ह्मण आहे कीं " जागेगा (जोवेगा) सो पावेगा, सोवेगा सो सोवेगा; " याचा अर्थ असा आहे कीं, जो उद्योग करूं लागतो त्यालाच लाभ होतो, आणि जो आळसानें निजून राहतो तो लाभास अंतरतो. आळसासारखा घातक शत्रु दुसरा कोणी नाहीं. आळसानें मोठाले लाभ हातचे जातात, आळस शरारांचा खरावा करितो; जे आपले मित्र असतात ते आळसामुळ शत्रु होतात असे आळसापासून अनेक प्रकारचे तोटे आहेत ह्मणून आळस टाकून उद्योग करावा. उद्योगावांचून प्रतिष्ठा होत नाहीं; उद्योगानें पाहिजे तो

पदार्थ मिळतो, उद्योगानें मोठालीं राज्यें हस्तगत होतात उद्योगानें मित्र जोडतात, उद्योगानें शत्रु जिंकता येतात, उद्योगानें संपत्ति मिळते उद्योगानें विद्या येते, उद्योगानें शरीरप्रकृति चांगली राहते, उद्योगानें ईश्वरीय ज्ञान प्राप्त होतें, उद्योगानें परलोक साधितां येतो; जो जो मनोरथ करावा तो तो उद्योगानें सफळ होतो. मनुष्याच्या पाठीमागें पोट आणि प्रपंच हीं लागलीं आहेत, ह्यासाठीं मनुष्यानें उद्योग अवश्य केला पाहिजे. आळशाचें कुटुंब उपाशी मरतें. द्रव्यावांचून निर्वाह तर होतच नाहीं आणि उद्योगावांचून द्रव्य मिळत नाहीं आणखीही एक गोष्ट अवश्यक लक्षांत ठेवण्याजोगी आहे ती अशी कीं, जर मन सुव्यवहाराकडे न लाविलें तर तें कुव्यवहाराकडे लागणार, कारण तें चंचल आहे ह्मणून तें उगाच बसणारें नव्हे. आळशास वाईट सोबती मिळतात आणि त्याच्या संगतीनें तो नानाप्रकारच्या फंदांत शिरून शेवटीं दुर्व्यसनांत बुडून जातो. ह्मटलें आहे कीं " पानी तेरा रंग कैसा, तो जिसमें मिलावे गविसा. " ह्याप्रमाणें दुसरी ह्मण आहे. "संगत करना बडेकी तो बडत बडत बड जाय, और संगत करना ठिलरकी तो थिट्टा पाणि उड जाय. " ह्मणजे ज्यांस सु शिक्षण प्राप्त झालें आहे त्यांच्याशीं सहवास ठेविला असतां आपली चांगल्या गुणांत बढती होत्ये, आणि अशिक्षित लोकांची संगत धरली असतां आपली जी थोडी बहुत अ असेत ती देखील जाते. ह्याप्रमाणें संगतीचा गुण आ याकरितां प्रत्येक मुलास बालदशेतच तो उद्योगास अनुसरे असें करावें, हा सुज्ञ मातापितरांचा धर्म होय, आयुष्यासा रखा अमोलिक पदार्थ दुसरा कोणताच नाहीं. वेळ हें

मुख्य द्रव्य होय. तिची एकेक घटका लाखाची जाते. व्यापारांत जातें तें प्रयत्नानें कदाचित् मिळवितां येतें, किंवा गमावलेला पैका कदाचित् सांपडतो; गेलेली अब्रू प्रयुक्तीनें मिळवितां येते सर्व वस्तु गेल्या असतां कदाचित् परत मिळतात; परंतु गेलेलें आयुष्य कधीं तरी परत येतें काय! नाहीं, हो नाहीं ! तर तें तुह्मी व्यर्थ जाऊं देऊं नका, त्याची लागवड करा, व त्यांत सत्कर्मरूपी बीं पेरा.

आयुष्य वेगें पळतें गड्या, ध्रु
चल कां उशीर लवकर फीर;
पळ घटका तास दिन,
मास, वर्ष, करिते ऋण
मरण जवळ जवळ येतें
कसा धरि धीर. लवकर फीर. ध्रु.
बाळपण, तरूणपण भर,
सरूनी होईल वृद्ध घर,
इंद्रियें हीं बंद पुढें
गलित शरीर; लवकर फीर ध्रु.
छंद. फंद, विषय, रंग,
आणि करशी फार दंग;
जगिक सुखीं गुंगू नको
लागेल तीर; लवकर फीर ध्रु.
तीर्थ, वारि, स्नान, दान
करूनी ह्मणसी पुण्यवान्
आतां घाण येति सारी,
वर केला फिर, लवकर फीर; ध्रु.

पहा, दमाडे दमडी खर्च केल्यानें जसे लाखो रुपये

जातात, तसेच पळ घटिका दवडल्यानें सर्व आयुष्य फुकट जातें, परमेश्वर अंतीं आपला झाडा घेईल, त्या वेळेस आपल्या आयुष्यांतील प्रत्येक पळाचा आह्मांस हिशोब द्यावा लागेल ह्मणून पळही फुकट न घालविण्याविषयीं फार जपावें.

ज्यापेक्षां आपणाजवळ विद्या व धन हीं फार थोडीं आहेत ह्मणून आपण आपल्या शक्त्यनुसार कोणतें तरी काम ज्यापासून विद्या अथवा धन प्राप्त होईल असें करावें असें माझें मत आहे, ह्मणून सर्व तरुण पुरुषांस माझें हेंच सांगणें आहे कीं त्यांनीं कांहीं तरी उद्योग धंदे करावेत आणि कलाकुशलतेकडे जास्त लक्ष द्यावें.

ह्या तरुणांची गोष्ट फार चमत्कारिक आहे, त्यांनीं उद्योग करणें नको; पण भीक मागणें बरें वाटतें. कसें असो; पण त्यानें हा बोध ऐकून त्याप्रमाणें उद्योग करण्याचें हातीं धरावें. ह्मणजे मला फार आनंद होईल. ईश्वर त्यांचे कल्याण करो.

या तरुणांच्या गोष्टीवरून असा बोध घ्यावा कीं, आपांनीं आपल्या लेकरांस लहानपणापासून उद्योग करण्याची संवय लावावी. नाहीं तर तीं थोरपणीं अशीं भटकत फिरतील.

पुष्कळ तरुण लोक असे आहेत कीं ते पुष्कळ करितात, परंतु त्या कामाचें वळण त्यांस नसल्यामुळें व्यर्थ जातें. ह्मणजे त्यांच्या उद्योगास जसें फळ तसें फळ येत नाहीं निरुद्योगी जे आहेत ते बेडकरून दयेस पात्र असतात, वेड्याचें सुख जसें कळतें, तसें निरुद्योगापासून जीं दुःखें उद्भवतात

कल्पना निरुद्योगी मनुष्यासच होते, इतर लोकांस ती होत नाहीं.

१ मनुष्यांनीं प्रातःकाळीं उठावें, पुष्कळ पुरुषांस आणि विशेषें करून स्त्रियांस अशी संवय असते कीं, एकदां बिछान्यावर अंग टाकलें कीं इकडे सूर्योदय होऊन चार पांच घटिका जरी दिवस आला तरी उठत नाहींत. संवय फार वाईट आहे. उशिरां उठलें ह्मणजे आपलें काम आरंभण्यास फार उशीर होतो आणि मग त्या दिवशीं बहुत करून सर्व कामाचा बिघड होतो. जे प्रातःकाळच्या प्रहरीं निजतात ते आळशी आणि अल्पायुषी होतात. जे लोक सकाळीं निजून राहतात त्यांस निरोगी आणि ताजी हवा मिळत नाहीं. ते सदा रोगी असतात. त्यांच्यानें कोणतेंही काम लवकर करवत नाहीं.

२ प्रातःकाळीं उठून प्रथम परमेश्वराची प्रार्थना करावी, नंतर दुसऱ्या कामास प्रारंभ करावा.

३ प्रत्येक दिवशीं जें करायाचें आहे, त्याच्या पूर्वी त्याचा संकेत करावा आजच्या दिवशीं किती काम करावयाचें आहे त्याचा पूर्वी जर संकेत केला नाहीं तर तेंच काम दोन दिवसांतही आटपणार नाहीं. आणि आपण आज काय केलें हेंही समजणार नाहीं, त्यासाठीं जें जें काम ज्या ज्या दिवशीं कराल तें तें काम त्या त्या दिवशीं एक चोपडी करून त्यावर दररोजचें केलेलें काम लिहावें, ह्मणजे तुह्मांला किती आपण नेहमीं काम करितों तें सहज समजून येईल.

४ कोणताही उद्योग सतत करावा. उद्योग करणारीं मनुष्यें पुष्कळ सांपडतील. परंतु त्यांपैकीं सतत उद्योग

करणारीं फारच थोडीं सांपडतील.

५ सतत उद्योग करण्यासाठीं मनुष्यास मनोनिग्रह पाहिजे.

६ एकच काम जरी वर्षानुवर्ष करीत गेलों तरी जर तें बरोबर केलें नाहीं तर तें व्यर्थ होतें.

७ आपलें काम आपणच करावें दुसऱ्यावर टाकूं नये, परंतु या देशांतील कित्येक स्त्रिया आपलें काम दुसऱ्यावर टाकण्यांत शिरोमणी आहेत. आपलें काम दुसऱ्यावर टाकलें असतां कालनियम मोडण्याचें आणि तें बरोबर न होण्याचें भय असतें.

८ होईल तितक्या धंद्याची माहिती करून घ्यावी. आपल्या धंद्याखेरीज आपणास दुसरें कांहीं माहीत असूं नये असा समज खोटा आहे. अशी म्हण आहे कीं, "ज्या रस्त्यानें जावयाचें नाहीं त्याची चौकशी कशास पाहिजे." तर असें नाहीं, कोणताही धंदा असला आणि तो शुद्ध, म्हणजे त्यांत असत्य नसल्यास त्याची माहिती करून घेणें हें वाजवी आहे.

या खेरीज आणखी कांहीं नियम कादूं लागलों तर निघतील; पण मला वाटतें वर सांगितलेले नियम जर लोक पाळूं लागतील तर त्यांतच त्यांचे कल्याण होईल अशी माझी पूर्ण खात्री आहे.

सुख म्हणजे काय व तें कशानें प्राप्त होतें.

षड्गुणैश्वर्यसंपन्न भगवंतानें मनुष्यास बुद्धि, ज्ञान व सदसद्विवेक हीं देऊन सर्व प्राण्यांमध्येंही श्रेष्ठत्व दिलें आहे. हें त्यांस स्वेच्छाचारानें वागण्यास दिलें आहे असें नाहीं त्याची ज्ञानशक्ति जशी मोठी आहे तशीच त्याजवर जबाबदारीही मोठी आहे. सर्व लोकांस आपल्या कायिक, वाचिक, व मानसिक कर्माचा हिशोब, इतकेंच नाहीं तर इहलोकीं ही कर्मांप्रमाणेंच त्यांची स्थिति असते. चांगल्या कर्माचें चांगलें फळ, व दुष्ट कर्माचें दुष्ट फळ, तें जरी तात्काळ दृष्टोत्पत्तीस आलें नाहीं तरी परिणामीं प्रत्ययास येतें व जे मनुष्य सदाचारानें वागतात ते सुखी सर्वदा असतात.

ह्या जगांत लोकांची स्थिति किती भिन्न आहे पहा. कोणी वाघाशीं ही झुंजतील असे बळकट आहेत; कोणीं वाऱ्याच्या साधारण झोकानें पडतील असे अशक्त आहेत. कोणी इतके धनवान् आहेत कीं, जसें काय त्याच्याकडे कुबेराचें भांडवल भरलें आहे; कोणी असें आहेत कीं त्यांस पोट भर अन्न देखिल खावयास मिळत नाहीं. कोणी एवढ्या मोठ्या अधिकारावर आहेत कीं, सर्व जग त्यांस नमतें व त्यांचा हुकूम पाळतें; कोणास इतकी ताबेदारी आहे कीं त्यांच्या शरिरावर देखील त्याची सत्ता चालत नाहीं. कोणाचें शाहाणपण इतकें आहे कीं, त्यांस केवळ देव गुरूचाच अवतार म्हटलें तरी चालेल, कोणी सूकराप्रमाणें अज्ञानकर्दमांत आपलें आयुष्य घालावितात. परंतु सुख

ह्मणून जी वस्तु आहे ती सदृढ प्रकृति, विपूळ धन, किंवा अचाट चातुर्य ह्यांत आहे असें नाहीं इतिहासांत एका राजाची अशी कथा लिहिली आहे कीं त्यानें त्यावेळीं माहीत होती तितकी सर्व पृथ्वी जिंकून घेतल्यावर अधिक पृथ्वी जिंकण्यास राहिली नाहीं, ह्मणून तो दुःखानें रडूं लागला, आणि एकादा गरीब शेतकरी ही सद्गुणानें वागून सुखानें आपलें आयुष्य घालवितो. यावरून सुख हें केवळ राज्यादि संपत्तीचें फळ आहे असें नाहीं, तर पुण्याचें फळ आहे असें स्पष्ट दिसतें.

आतां पुण्य ह्मणजे काय हा प्रश्न मोठा गहन आहे. या भरतखंडांत व पश्चिमद्वीपांत आजपर्यंत महान् महान् तत्ववेत्ते होऊन गेले; परंतु त्यापासून कोणीही, पुण्याचें मुख्य तत्व अमुक आहे असा निर्विवाद सिद्धांत करून स्पष्टीकरण केलें नाहीं. तरी पुण्य कोणतें व पाप कोणतें, याची कल्पना सर्व मनुष्यास स्वाभाविकच होते यां विषयावर ध्यानांत ठेवण्या जोगें एक सुंदर संस्कृत वाक्य आहे ते असें:—

॥ अष्टा दश पुराणेषु व्यासस्य वचन द्वयम् ॥
॥ परोपकारःपुण्याय पापाय परपीडनम् ॥

अर्थः— अठरा पुराणांचा सारांशभूत अशीं व्यासांचीं दोन वचनें आहेत; एक, दुसऱ्यावर उपकार करणें हें पुण्यास कारण होय, व दुसरें, दुसऱ्यास पीडा देणें हें पापास कारण होय.

या वरच्या वचनांवरून आमच्या शास्त्राचा निर्णय असा आहे कीं परोपकाराचें फळ पुण्य आहे आणि सुख हें पुण्याचे फळ आहे. तर ज्यास सुखाची इच्छा असेल

त्यानें लोकोपकार करीत असावें:—जो गरीबाची करुणा करून त्यास सुख होण्याचा उद्योग करील त्याची करुणा देवास येऊन तो त्यास सुखी करील.

आतां कोणी ह्मणले कीं ज्यापेक्षां प्रत्येकास सुखाची इच्छा आहे त्यापेक्षां प्रत्येकास सर्वांवर उपकार केले पाहिजेत, तर एकाच्या हातून सर्वांवर उपकार होतील तरी कसे? ह्यास असें उत्तर आहे कीं ह्या जगांत कधीं कधीं ईश्वर असे भाग्यवान् प्राणी उत्पन्न करितो कीं. त्याच्या हातून सर्व जगाचें कल्याण होतें.

विवाह.

आपल्य पुत्राचें कसें तरी लवकर लग्न करावें हा विचार आईबापांच्या मनांत पक्का भरलेला असतो. आईबापांनीं आपल्या मुलांचीं लग्नें लवकर करण्यानें आपली क्षणिक इच्छा तृप्त करून घेतात त्या मुलांस त्यांचें सर्व आयुष्य दुःखांत घालविण्यास लावणें हें आईबापांचें मोठें दुःखकारक कृत्य होय. अशा प्रकारें आपली इच्छा पूर्ण करण्याऱ्या मातापितरांची संख्या आपल्या लोकांमध्यें फार आहे, यामुळें फार वाईट वाटतें लोक याकडे लक्ष देतील तर बरें होईल.

अल्प वयांत लग्न करणें, ही रीत फार वाईट आहे. बहुत लोकांस असें वाटतें कीं आपल्या लेकराचें लग्न आपल्या डोळ्यांदेखत झालें ह्मणजे आपण कृतकार्य

(३२)

झालीं, आपल्या पाठीमागें मग त्यांचें कसेंही होवो. आणि अशा हेतूनें अनेक कारणास्तव बहुत लोक आहेत ते आपल्या मुलांचीं लहानपणीं लग्नें करावयास फार उतावळे होतात. परंतु या रीतीपासून किती वाईट परिणाम होतो हें त्यांच्या लक्षांत येत नाहीं. अल्प वयांत लग्न केल्यानें जे वाईट परिणाम होतात ते सांग तों. पहिला परिणाम असा कीं, ज्याचें लग्न होतें त्याचा अभ्यास बुडतो. ज्या वयांत तरूणांनीं अभ्यास करावा असें आहे त्याच वयांत जर त्यांच्या पायांत लग्नाची बेडी घातली तर त्याच्यानें कधींही अभ्यास करवणार नाहीं. सांप्रत आपल्या लोकां मध्यें पुष्कळ तरूण मुलगे आहेत परंतु त्यातून. थोडेच नांवारूपास चढले आहेत. याविषयीं जीं अनेक कारणें आहेत त्यांपैकीं हें एक होय कीं, त्याच्या आप्तांचा त्यांच्या मागें लवकर लग्न करण्याचा धोशा लागलेला असतो. यामुळें कित्येक तरूण मुलांचा अभ्यास झाला नाहीं. याकरितां आपल्या मुलांचा अभ्यास चांगला होऊन त्यांनी या जगांत सुखानें वागावें अशी जर तुमची इच्छा आहे तर त्यांचीं लवकर लग्नें करूं नका.

अल्प वयांत लग्न करण्यानें लग्नाचीं सुखें त्यास प्राप्त होत नाहींत बारा तेरा वर्षांची मुलगी नुकतीच आपल्या आईच्या संसारांतील शहाणपण पाहूं लागते संसार काय आहे आणि तो कोणत्या रीतीनें चालवावा हें समजूं लागते, इतक्यांत तिचे आईबाप त्या कोमलकलिकेला घराबाहेर लावून देतात. मग ती आपल्या नवऱ्याचा सांभाळ कसा करील, तिनें संसार कसा चालवावा, नवऱ्याशीं कसें वागावें लेकराचा सांभाळ कसा करावा, चार मनुष्यें आपल्या घरीं आलीं असतां त्याच्याशीं कसें वागावें, हें तिला अनुभवानें समजलें असतें काय ? बहुत लोकांस लग्न झाल्यावर, आपल्या बायकोस स्वयंपाक करितां येत नसल्यामुळें कित्येक दिवस चुलीपाशीं जाळ घालीत बसावें लागतें. याचा अनुभव कित्येक मुलींच्या आईबापांस नाहीं काय ? असें असून ही आपल्या मुलांचीं लग्नें अल्प वयांत करण्यानें त्यांस कोणतें सुख साधून देतात बरें ?

अल्प वयांत लग्न केल्यानें मुलें प्रकृतीनें अशक्त उत्पन्न होतात. आईबापें अशक्त असल्यास मुलेंही तशींच अशक्त होतात. मुलें अशक्त असल्यास तीं या जगांत कोणता दिवा लावतील, याचा तुम्हीच विचार करा.

१ " सोयरिक करण्याची रीति. या रीतिविषयीं बहुत लोकांतच चुक होत असते मुलाला लग्नाविषयीं एक अक्षर ही न विचारतां केवळ आईबापें परस्पर सोयरिक पाहातात, या रीतीमुळें नवरा व बायको यांमध्यें प्रीतीची वृद्धि जशी व्हावी तशी होत नाहीं. याकरितां ज्यांचें लग्न व्हावयाचें त्यांनीं परस्परांस पाहून वरलें पाहिजे म्हणजे परस्परांनीं परस्परांची चांगली ओळख करून घ्यावी. आणि जर त्या उभयतांची एकमेकांबरोबर लग्न लावण्याची इच्छा आहे तर त्यानीं परस्परांस वचन द्यावें. असें केल्यानें आपल्या लोकांची फार उत्तम रीतीनें सुधारणा होऊन त्यांचें सदा सर्वकाळ कल्याण होईल.

२ " लग्नसंबंधी खर्च—" ऋण काढून सण करण्याची चाल आपल्या लोकांत फार आहे. आपलें उत्पन्न काय आणि आपली योग्यता किती हें लक्षांत न आणतां कर्ज काढून डामडौलानें लग्न करतात ही शेरमेची गोष्ट होय.

लग्न लावण्यापूर्वी कित्येक अशी अट धरून बसतात कीं, मुलीवर काय काय दागिने घालाल, व ते दागिने किती रुपयांचे घालाल, आणि तिच्या घरांत काय काय वस्त्रें द्याल, आंणि लग्नाच्या जेवणास किती लोक बोलवाल हें प्रथम सांगा. असें जे करितात, त्यांस लग्न ह्मणजे काय हेंच ठाऊक नाहीं.

३ " अल्प वयांत लग्न करूं नये. ज्या स्थितीविषयीं बरोबर माहिती नाहीं तींत आपण पडूं नये. लग्न कोणत्या कारणासाठीं करावयाचें याचा बरोबर विचार केल्या शिवाय तें करूं नये. केवळ कामवासनातृप्त होण्यासाठीं करूं नये; तर जगांतील मोहापासून दूर राहातां यावें व आपल्याकडून ईश्वरभक्ति निर्विघ्नपणें व्हावी या हेतूनें लग्न करावें, नाहीं तर त्यांस परस्परांपासून सुख न होतां त्यांच्या वर्तणुकीनें धर्माची निंदा मात्र होईल.

४ " लग्न झाल्यावर वेगळें राहवें, आईबापांमध्यें राहून बायकोला सासुरवासाच्या कचाटांत पाडूं नये; वेगळें राहण्यांत अनेक फायदे आहेत. आईबापांमध्यें राहिल्यानें जे अनर्थ होतात ते सर्व टाळल्यानें बायकोची प्रीति नवऱ्यावर बसती तिचें मन घरसंसारांत चांगलें लागतें व सर्व जबाबदारी आपल्या माथ्यावर आहे हें मनांत आणून ती विशेष विचारानें व जपून वागती. यास्तव वेगळें राहणें अवश्यक आहे.

५ " विवाहित स्त्रीपुरुषांची अत्यंत प्रीति असल्याचांचून विलक्षण सामर्थ्याची संतति होणें नाहीं. सीतारामाचें उदाहरण प्रीतिभावाचें सर्वांच्या तोंडांत आहे. लवकुशांचें सामर्थ्य पित्यापेक्षांही मोठें व त्यास विस्मयांत घालणारें होतें. सुभद्रेच्या प्राप्तीसाठीं अर्जुनानें कपट संन्यास घेतला होता. अभिमन्युचा अल्प वयांतला पराक्रम पहा. भीमसेनाचा पुत्र घटोत्कच हेडंबीपासून झाला. द्रौपदी पासून झाला नाहीं. कृष्णाचा पुत्र मदन पराक्रमी केवढा, रुक्मिणीपासून झालेला, आणि त्यांची प्रीति याचें पुराणांत वर्णन प्रसिद्ध आहे. हरिश्चंद्र-तारामतीचा पुत्र रोहिदास याची अल्प वयांतील बुद्धि आणि पितृभक्ति विस्मयकारक नव्हे काय ? शंकराचार्याचें सामर्थ्य प्रसिद्ध आहे. त्यांच्या आईबापांची प्रीति परस्पर फारच होती अशी कथा आहे.

६ " दंपत्याची परस्पर प्रीति उत्तमप्रकारची नसली अथवा खडाष्टक असेल आणि तेथें विलक्षण सामर्थ्याची संतति निपजली ह्मणजे लोकांच्या मनोवृत्ति कशा असतात हें सांगणें नकोच. चित्त स्वच्छ नसतें हें उघड आहे.

७ " एका रक्तांतील विवाहसंबंधापासून पिंडे रोगावस्था, व कफक्षय, अवयव न्यूनत्व व शरीर व मानसिक क्षीणता, याचा प्रादुर्भाव होतो, ही गोष्ट निःसंशय आहे.

८ " अयोग्य सोयरिक करूं नये, ह्मणजे आपल्यापेक्षां थोर किंवा हलके असतील, किंवा ज्याची अब्रु व चाल चांगले नसेल, किंवा ज्याच्याठायीं धार्मिकपणा नसेल त्यांच्याशीं लग्नसंबंध करूं नये; केल्यास नवरा व बायको एकमेकांस तुच्छ मानतील व त्यास परस्परांपासून सुख होणार नाहीं.

९ " लग्न झाल्यावर जेणेंकरून नवरा बायको यांच्या प्रीतींत अंतर पडेल असे सर्व प्रकार वर्ज करावे. मुलींच्या आईबापांनीं मुलीस आपल्या घरीं नेऊन तिचा

व तिच्या नवऱ्याचा वियोग करूं नये. तसेंच मुलाच्या आईबापांनीं त्यास विभक्त राहण्यास मनाई केल्यानें त्याच्या संसाराचा नाश होईल. तसेंच नवरा बायको यांनीं परस्परां विषयीं गाऱ्हाणीं करूं नयेत, अपमान करूं नये, आणि कलह व मारहाण करूं नये.

वर लिहिलेल्या नीयमांप्रमाणें जे लोक चालतील त्यांचें सदा सर्वकाळ कल्याण होईल. आणि मी ईश्वरापाशीं त्याविषयीं प्रार्थना करितों.

स्त्रीशिक्षण.

स्त्रियांस विद्या शिकवून त्यांची सुधारणा करणें हें लोकांच्या विचाराविरुद्ध होतें इतकेंच केवळ नाहीं तर स्त्रियांस विद्या शिकविली असतां अधर्म घडतो अशी त्यांची समजूत पडली होती. आणि यामुळें आपल्या देशांतील सर्व स्त्रिया आजपर्यंत निरंतर दासपणांत आहेत. आणि बहुत लोकांनीं "स्त्रियांस विद्या शिकविणें" या विषयावर वाद विवाद केले, पुष्कळ पैसे खर्चून पुस्तकें छापविलीं आणि शेवटीं लाखो रुपये खर्चूं करून मुलीच्या शाळा घातल्या आहेत, या सर्व शाळा बहुत करून आजपर्यंत चांगल्या चालत आहेत आणि आतां मी माझ्या पुष्कळ मैत्रिणींस पाहतों कीं, त्या अज्ञानरूप परजांतून निघून ज्ञान रूप मैदानांत हवा घेत फिरत आहेत .तर स्त्रियांना एवढा मोठा सुप्रसंग देवानें दिला असतां, आपण खुशीनें आप-

ग्रंथांत घरव्यवस्थेविषयीं चांगले तीन नियम सांगितले आहेत तेच तुह्मांला सांगतों ते येणें प्रमाणें:—

जेथली वस्तु तेथें ठेवा.
ज्या कामाची वस्तु त्या कामाकरितां ठेवा.
जेव्हांचें काम तेव्हां करा.

जें चांगलें ऐकिलें असेल तें मनांत ठेवा आणि तसें करण्यास प्रयत्नही करा. ईश्वर तुह्मांस आशीर्वाद देवो अशी माझी प्रार्थना त्याजपाशीं आहे.

स्त्रियांस मानसन्मान.

प्राचीन काळीं स्त्रियांस वर्तविण्याची व त्यांची मानसन्मानता राखण्याची रीति फार चांगली होती. असें मोठे विद्वान् गृहस्थांच्यां ग्रंथांवरून दृष्टोत्पत्तीस येतें. त्यांत आद्यस्मृतिकर्ता महापूज्य जो मनु तो स्त्रियांस वर्तविण्याविषयीं असें लिहितो:—

पितृभिर्भ्रातृभिश्चैताः पतिभिर्देवरैस्तथा ॥
पूज्या भूषयितव्याश्च बहुकल्याणमीप्सुभिः ॥
यत्रनार्यस्तु पूज्यन्ते रमंते तत्र देवताः ॥
यत्रैतास्तु न पूज्यंते सर्वास्तत्राफलाःक्रियाः ॥
शोचंति जामयो यत्र विनश्यत्याशुतत्कुलम् ॥
नशोचंति तु यत्रैता वर्धते तद्धि सर्वदा ॥
जामयोयानि गेहानिशपंत्यप्रतिपुजिताः ।
तानिकृत्याहतानीति विनश्यंति समंतथः ॥

तस्मादेताः सदा पूज्या भूषणाच्छादनाशनैः ।
भूतिका मैर्नरैर्नित्यं सत्कारेषू त्सवेषुच ॥
संतुष्टो भार्यया भर्ता भर्त्रा भार्या तथैवच ।
यस्मिनेव कुलेनित्यं कल्याणं तत्रवैध्रुवम् ॥
यदिहि स्त्रीन रोचत पुमासंन प्रमोदयेत् ।
अप्रमोदात्पुनः पुंसः प्रजनंन्न वर्तते ॥
स्त्रियां तुरोचमानायां सर्वतद्रोचते कुलम् ।
तस्यांन त्वरोच मानायां सर्वमेव नचोरते ॥

भावार्थ.—सुख व संपत्ति हीं आपणास मिळवीं. अश इच्छा करणारे जे पिते, भ्राते, दीर, इत्यादि, यांनीं हि यांस सन्मान द्यावा. उत्तमप्रकारचीं वस्त्रें प्रावरणें व लंकार भुषणांनीं त्या सुशोभित कराव्या. ज्या कुटुंबांत यांस उत्तम मान मिळतो, त्यांस सर्व देवता संतुष्ट होऊ राहतात; परंतु ज्या कुटुंबांत स्त्रियांस सन्मान मिळत न त्यांत मोठ मोठाले यज्ञ याग, तपश्चर्या, दान धर्म, वं सर्व पुण्यकारक कर्मे केलेलीं अगदीं निष्फळ होतात. कुटुंबांत स्त्रिया दुःखित असतात तें कुटुंब लवकरच न पावतें. आणि ज्यांत स्त्रिया सुखी असतात त्या कुल सर्वदा वृद्धि होत असते. स्त्रियांस योग्य सन्मान न ळाल्यामुळें त्या ज्या कुटुंबांस शाप देतात त्यांस आकाबाई सा लागून तीं सर्वथा नष्ट होतात. यास्तव आपल्या कु ऐहिका मुष्मिक कल्याण असावें अशी ज्या पुरुषांची आहे त्यांनीं सणवार वगैरे कांहीं यत्किंचित् विशेष झालें कीं स्त्रियांस उत्तमप्रकारचें जेवण खाण, ण, दागदागिने वगैरे देऊन त्यांचा उत्तम प्रकारें करावा आणि त्यांस सर्वदा सुखी राखावें, ज्या

नवरा, बायकोवर संतुष्ट असतो म्हणजे दुसऱ्या स्त्रीची इच्छा करीत नाहीं व बायकोही नवऱ्यावर संतुष्ट असते, त्यांचें सदा सर्वकाळ कल्याण निश्चयें होतें. जर वस्त्रालंकार इत्यादिकांनीं स्त्री शोभायमान झाली नसले तर ती पुरुषाच्या चित्तास आल्हाद देणारी होत नाहीं आणि पुरुषास आल्हाद न झाला तर त्यापासून गर्भबीज प्राप्त होत नाहीं. स्त्री जर कुटुंबांत सुशोभित ठेविली तर तें सर्व कुटुंब शोभतें, आणि तीं जर विशोभित ठेविली तर सर्व कुटुंबच विशोभित होतें.

हा वरील फक्त एकाच स्मृतिकर्त्याचा मताचा नमुना आपणास सादर केला आहे. पण इतर स्मृतिपुराणादि कर्त्यांचें मत असेंच आहे. व्यासांनीं संसारांतील जमाखर्च लिहिण्याचें काम स्त्रियांकडे सोपवावें व तें काम त्यांनीं भोजनोत्तर करावें असें आपल्या स्मृतींत लिहिलें आहे.

नर्तन, गायन, चित्र काढणें इत्यादि मनास रमविणाऱ्या कला व अनेक कौशल्याचीं कामें स्त्रियांस शिकवींत अ. सत, हें महा भारतांतील उत्तरादिकांचा इतिहास वाचला असतां ध्यानांत येईल, या प्राचीन काळांत स्त्रिया फार चतुर असत त्या आपल्या चातुर्यानें पुरुषांस विशेष रमवीत च उत्तम प्रकारची मसलत देत असत तेणें करून व्याभिचारदोष फार कमी होत असे. या शिवाय अपत्तींच्या प्रसंगीं पुनर्विवाह चालू असावा. नियोग म्हणजे दीर इत्यादिकांपासून पति मृत झाला किंवा कोणत्या. ी कारणानें असमर्थ असल्यास त्याच्या भावापासून अथवा वळच्या सापिंडापासून अथवा विद्वान् ब्राह्मणापासून एक न पुत्र करून घेण्याचा संप्रदाय सुरू होता. धृतराष्ट्र

पंडु विदुर हे अति प्रसिद्ध पुरुष नियोगापासून उत्पन्न झालेले होते. व्यभिचारास प्रायश्चित्त जबर असत व तीं बायकांपेक्षां पुरुषांस दुप्पट किंवा तिप्पट अधिक असत प्राचीन काळीं व्यभिचाराच्या प्रतिबंधास पुष्कळ अंशीं वरील गोष्टी कारणीभूत होत्या असें कोणाही मनुष्याच्या अंतः करणांत आल्या वाचून राहणार नाहीं.

प्राचीन काळीं सीता, कैकयी, रुक्मिणी, सत्यभामा, द्रौपदी, सुभद्रा, उत्तरा इत्यादि स्त्रिया विद्वान् होत्या हें बहुत करून सर्वांस माहीत असेलच त्यांचे पति आपल्या आप्त इष्ट मित्रास फारच मान देत असत. ही प्राचीन काळची रीति फार चांगली होती. अर्वाचीन काळच्या पुरुषांनीं ही रीति अगदीं बुडवून टाकीली पुरुष जसे स्त्रियांस वर्तवितील तसेंच स्त्रियांनीं वागावें, त्यांस अमुक प्रकारचे हक्क आहेत असें मुळींच कोणी समजत नाहीं. पुरुषानें स्वतः पाहिजे तितका ऐष आराम भोगावा, पाहिजे त्या रीतिनें पारदार्य अथवा व्यभिचार करावा, यवनादी अति नीच मानलेल्या जातीच्या ही स्त्रियांस आपणास धार्मिक मानणाऱ्या पुरुषांनीं रात्रंदिवस घरांतच बाळगाव्या, इतकेंच नव्हे तर आपल्या धर्मपत्नीकडून अशा दुष्ट आचरण करणाऱ्या स्त्रियांची सुश्रूषा करावी उभयतांनीं एका शैय्येवर निजून त्या धर्मपत्नीकडून उभयतांचे पायही रगडवावे ? पेक्षां निंद्य कर्म तें काय उरलें ? " धर्मेंच, अर्थेंच, कामेंच नातिचरामि " अशी नवऱ्यानें प्रतिज्ञा देवाग्निब्राह्मण समक्ष केली, ती कोठें गेली याचा कांहीं तरी विचार आ काय ? मित्रहो, या प्रकरणीं ज्या पूर्वजांची रीती व नि दाखविले आहेत त्याचेच वंशज आपण आहां, तर आप

यांचा जरूर विचार करावा.

स्त्रियांस जे धर्म, जीं व्रतें व अनुष्ठानें व जीं प्रायश्चित्तें सांगितलीं आहेत, तीं त्याच्या सुकुमार व नाजुक शरीरांवर व कोमल मनावर दृष्टि देऊनच ऋषींनीं सांगितलीं आहेत. व्रतवैकल्यें हीं सर्व पुराणकर्त्यांनीं सांगितलीं असून केवळ अर्वाचीन काळीं उत्पन्न झालीं आहेत. त्यांचा प्राचीन काळीं प्रसार नव्हता. त्यांचे बहुतेक सर्व धर्मपतीच्या धर्मांतच अंतरभूत झालेलीं असत. त्यांच्या हातून घडलेल्या पापांच्या प्रायश्चित्तांचा विचार खालीं लिहिल्या प्रमाणें आहे.

आपस्तंब, हारित व अंगिरा हे ऋषि—

अशीतिर्यस्य वर्षाणि बालोवाप्यून षोडशः ॥
प्रायश्चित्तार्धमर्हंति स्त्रियोरोगिण एवच ॥

सुमंतु.

अर्वाक्तु द्वादशाब्द षोडशी तेरूध्वेमेववा ।
अर्धमेव भवेत्पुंसां तुरीयं तत्रयोषिताम् ॥

विष्णु.

स्त्रिणामर्धं प्रदातव्यं वृद्धानां रोगिणांस्तथा ।
पादोबालेषुदातव्यः सर्व पापे वयं विधिः

भावार्थ—बारा अगर सोळा वर्षांच्या वयाच्या पूर्वीच्या आणि ऐशी वर्षांच्या वयाच्या नतरच्या पुरुषास, स्त्रियांस व रोगग्रस्त मनुष्यास सामान्य पुरुषास जें प्रायश्चित्त सांगितलें असेल त्याच्या निमें द्यावें. ऐशी वर्षांच्या वरील व

बारा वर्षांच्या व अज्ञान बालकास एक चतुरथांश द्यावे हरए क पापाच्या प्रसंगीं हाच निर्णय समजावा.

नवऱ्यानें बायकोस कसें वागवावें त्या-विषयीं नियम.

(१) प्रत्येक मनुष्यानें आपल्या बायकोची योग्यता आपणापेक्षां कमी मानूं नये, तिला ममताळुपणानें वागवावें आणि तिला कांहीं सांगणें अथवा बोलणें झाल्यास हुकु-माच्या तो यानें सांगूं नये. बहुतेक लोक असें करितात कीं ते आपल्या बायकांस केवळ बटकीप्रमाणें वागवितात.

(२) आपल्या शक्तयनुसार हरएक जिन्नस विकत घेण्यास त्यांच्या जवळ पैसा द्यावा, व त्यांचे मनोरथ पूर्ण करावे.

(३) कोणतेंही काम करण्यामध्यें बिघड झाला अस-तां अथवा जेवणास वेळ झाला असतां व अशा प्रकारची कमव्यवस्था झाली असतां त्यांना शिवीगाळ करूं नये.

(४) आपण कोणतेंही काम हातीं घेतलें असतां त्यांत कांहीं विघ्नें आलीं तर आपली बायको शहाणी व बिचारशील असल्यास तिचें अनुमत घ्यावें. पुष्कळ लोक आपल्या शाहण्या बायकांच्या सल्यानें मोठमोठ्या संक-टांतून पार पडले आहेत आणि पुष्कळ मूर्ख लोक आप-ल्या बायकांचें मत घेणें हा हलकेपणा आहे असें समजून

महत् संकटाच्या कचाटांत सांपडले आहेत.

(५) आपली स्थिति जर वाईट असली तर ती आ-पण आपल्या बायकांस मोकळे मनानें निवेदन केली असतां त्या घरखर्चामध्यें कांहींना कांहीं तरी काटकसर करतील, पुष्कळ बायकांस आपल्या नवऱ्याची खरी स्थिति न समजल्या कारणानें त्या वाजवीपेक्षां फाजील खर्च करितात.

(६) आपल्या बायकांचा चारचौघांमध्यें आपमान करूं नये, जर तिच्या अपराधाविषयीं कांहीं बोलणें असेल तर तिला एकांतीं बोलावें.

बायकांचें नवऱ्याशीं वर्तन व त्या विषयीं नियम.

(१) नवरा बाहेरून आला असतां बायकोची मुद्रा प्रफुल्लित असावी व घरांतील सर्व सामान सुमान नीट व्य-वस्थेनें लावावें ज्या प्रमाणें नवरा बायकोवर प्रीति करितो त्याचप्रमाणें तिनेंही त्याजवर करावी.

(२) बायकोनें नवऱ्यास जसे जसे पदार्थ आवडतील तसतसे तिनें करण्याविषयीं झटावें व सर्व कुटुंबाची व्यवस्था त्याचा मर्जीप्रमाणें ठेवावी, आणि आवडीतील तशा ठेवाव्या.

(३) आपल्या नवऱ्यास आपल्या ताब्यांत ठेवण्यावि-

षयीं प्रयत्न करूं नये, कारण असें केलें असतां नवऱ्याचा अपमान होतो.

(४) नवऱ्याचें ह्मणणें रास्त असल्यास तें ऐकावें-

५ आपल्या नवऱ्याशीं विकोपास जाण्या सारखी भाषणें करूं नयेत. परक्यांच्या अथवा मित्रांच्या देखत बायकोनें असें भाषण केलें असतां त्यापासून फार वाईट परिणाम होतो-

६ नवऱ्याच्या कामामध्यें त्यानें विचारल्याशिवाय कधीं बोलूं नये, व असेंच करा असा त्यास आग्रह करूं नये.

(७) नवऱ्याच्या हातून कांहीं चूक झाली असतां ती कोणाजवळ सांगूं नये, अथवा आपसांत भांडण झालें असतांही कोणाजवळ सांगूं नये.

८ जर नवरा विद्वान् व शाहणा असेल तर त्याच्याशीं शाहणपणाच्या विषयांवर बोलण्यास बायकोही हुशार असल्यास ठीक पडतें.

९ ज्या गोष्टींपासून नवराबायकोमध्यें बनाव होतो ती गोष्ट वर्ज्य करावी.

१० बायकांनीं हेंही लक्षांत ठेविलें पाहिजे कीं आपला नवरा कोणताही धंदा अथवा उद्योग करीत असतां कधीं कधीं प्रसंगानुसार त्यास तोटा येतो ही गोष्ट लक्षांत ठेवून खर्च बेतानें ठेवावा, आणि व्यर्थ खर्च करून नवऱ्याचें दूषण लावून घेऊं नये. सर्वांस माझी अशी विनंती आहे कीं आपणास काटकसर करणें झाल्यास वस्त्र प्रावरणामध्यें करावी, परंतु मजुरास मजुरी देण्यांत मात्र करूं नये.

परस्त्रीचा मार्ग नाशाकडे.

आर्या.

१ उकरुनि उकरुनि भारी
शिरतां ह्या नाशितात घरघूशी;
तन मन धन अब्रूचा
विनाश करिती तशाच घरघूशी.
२ किती तरी बोध करावा
अद्यापी तूं हि सोडिना गवशी;
बहुत धुळीस मिळाले
सोडुनि दे तूं खचीत नागवशी.

पोकळ सुख.

तूर्त आपल्या ठायीं ज्या इच्छा उत्पन्न होतात त्या तृप्त कराव्या या शिवाय सुख प्राप्तीचें दुसरें साधन आहे असें विचारशून्य लोकांस वाटत नाहीं. त्यांस पाहिजे तो पदार्थ मिळाला ह्मणजे ते संतुष्ट होतात, आणि आपण मोठे सुखी आहों असें ते समजतात. पण खरें सुख ह्मणजे काय, व तें मानवांस कोणत्या रीतीनें लाभतें व आपणास कसें लाभेल ह्याचा विचार ते करीत नाहींत. कित्येक पदार्थ असे आहेत कीं ज्यांचें सेवन केलें असतां हा एक प्रकारचा रोगच आहे; त्यापासून जी मजा होते

ची चट लावून घेतात. त्या पदार्थाची चट लागल्या वर त्यांच्या सेवनें थोडावेळ मजा वाटत असेल ह्यांत संशय नाहीं;परंतु ज्यांस अशी कांहीं संवय नसते व जे असल्या गोष्टींचा उपयोगही घेत नाहींत, त्यांच्यापेक्षां म्हणजे लोक सुखी असतात असें ह्यावरून अगदीं ठरत नाहीं.

अशा कारणीच्या सुखाच्या साधनांपैकीं दारू, अफू, तंबाखू, भांग वगैरे मादक पदार्थांचीं व्यसनें हीं विशेष प्रचारांत फार आहेत. ह्या सर्व पदार्थांचे गुण एक एक सारखे वाईटच आहेत असें नाहींत, तर त्यांतून कांहीं असें आहेत कीं त्यांचें सेवन परिमितपणे केलें असतां शरीरप्रकृतीस विशेष बाधक होऊन प्रतिष्टेत ही यूनता होत नाहीं. परंतु त्यांतील बहुतेकांचीच व पहिल्यानें फार वाईट लागते. ते पदार्थ पचणें तर दूरच; पण ते पोटांत गेल्या बरोबर क्षणभर ही न ठरतां उलटून पडतात तरी हे लोक नेहमी त्यांचें सेवन करून त्यांचा इतका अभ्यास करितात की पुढें ते पदार्थ रूचीस वाईट लागतनासे होऊन तेणेंकरून शरीराच्याठायीं होणारें कार्य ही चांगलें वाटूं लागतें. याप्रमाणें उत्तेजक मादक पदार्थांची मुद्दाम सवय लाऊन घेणें ह्यांस आह्मीं " पोकळ सुख " ही संज्ञा दिली आहे व ती योग्य आहे असें आह्मांस वाटतें. वर सांगितलेल्या पदार्थांच्या सेवनेंकरून मनुष्यांच्या सुखाची खरोखर वृद्धि होते किंवा नाहीं ह्याचा निर्णय करण्याकरितां त्यांच्या योगानें कांहीं वेळ टाळणारी जी मजा तिच्या खेरीज आणखी काय काय होतें हें पाहिलें पाहिजे.

ह्या पदार्थांचा [illegible] कीं, त्यांची

जीव फार व्याकुळ होतो; आणि असे प्रसंग तर वारंवार येतात तेव्हां लागली असतां सोईच्या वेळेसही त्या तलफेचा पदार्थ मिळेल असें होणें कठीण. ह्या पदार्थांचा दुसरा गुण असा आहे कीं, ते सेवन केले असतां दुसऱ्या लोकांस त्रास होतो. जसें दुसऱ्यांनीं आपल्याशीं वर्तावें म्हणून आपण इच्छितों तसें आपण दुसऱ्यांशीं वर्तावें, हा जो सर्वोत्तम नियम सर्व साधारण लोकांस काय पण सर्व सभ्य लोकांसही मान्य आहे, त्याप्रमाणें पाहिलें असतां, जसें आपल्या सुखाचें आपल्यास अगत्य वाटतें, तसें दुसऱ्याचे सुखाचें दुसऱ्यासहि खरें अगत्य आहे. यास्तव कैफी पदार्थांच्या सेवनानें आपल्याला जें सुख प्राप्त होतें त्यापासून दुसऱ्यांस जो त्रास होतो तो वजा केला पाहिजे आणि मग तें सुख आपण घेतलें पाहिजे. ह्या गोष्टीच्या उदाहरणार्थ आपण एका कैफीपदार्थाविषयीं विचार करूं या. ज्यांस तंबाखू खाण्याचें किंवा ओढण्याचें व्यसन असतें त्यांच्या ह्या संवयी वरून दुसऱ्यास त्रास किती होत असेल हें त्याच्या स्वप्नींहो नसतें ज्यांस असल्या व्यसनी मनुष्या पासून मनस्वी त्रास होतो ते बहुधा निमुटपणें तो त्रास सोसतात. आपल्या शेजारीं तंबाखूचा व्यसनी बसला असला तर त्याला " महाराज, आपल्या मुखांतील श्वास व वस्त्रांस तंबाखूचा दुर्गंध येतो तेणेंकरून मला फार त्रास होतो यास्तव मी नाकास पदर धरितों याबद्दल मला माफी असावी, असें म्हणणें कोणालाही बरें वाटणार नाहीं. भ्यतेमुळें जरी कोणी असें बोलत नाहीं तरी त्याच्या मनांत अशाच भावना येत असतात. आणि असली व्यसन हा एक प्रकारचा रोगच आहे; त्यापासून जी मजा होते

झणून व्यसन्यांस वाटतें, ती त्या रोगाविषयीं त्यांची डोळे झांक असते तंबाखूच्या तलफीनें तळमळ होते ती शांत करण्याकरितां कोणी गुडगुडी ओढतो, कोणी विडी ओढितो, तेव्हां त्यास निःसंशय जो आराम वाटत असेल त्याचा मला कांहीं अनुभव नाहीं; त्याच प्रमाणें ज्या मनुष्याचें डोकें मनस्वी दुखतें तो जेव्हां गार ओला रुमाल मस्तकावर ठेवितो, तेव्हां त्यालाही मोठें समाधान वाटत असेल, व मला मस्तक दुखण्याची मुळींच व्यथा नाहीं झणून त्या समाधानाचें मला कांहीं ज्ञान व्हावयाचें नाहीं; पण त्याचा अनुभव व ज्ञान व्हावें एतदर्थ जर मी हटकून मस्तक शूलाची व्यथा लावून घेण्याचा इलाज करीन, तर मी केवढा मूर्ख झणावा बरें ! त्यापेक्षां ज्याला हा विकार झाला असून त्याचे शमन होण्याकरितां असले उपाय करावे लागतात त्याची मला दया यावी हें बरें. त्या प्रमाणें ज्यानें आपल्या प्रकृतीस असें दुर्व्यसन लावून घेतलें आहे त्याचे शमन करण्याकरितां नेहमीं तंबाखु खाण्याला, ओढण्यास अथवा दारू पाजावयास पाहिजे, नाहीं तर दुर्दशा होईल अशा मनुष्याची मी आपणास दया येऊं देईन; पण माझी इच्छा त्या पदार्थांवर होत नाहीं.

इया प्रकृतीस असली कांहीं रिकामी संवय लागली नसल्या मुळें

अमली पदार्थांचें व्यसन लावून घेण्याचें आणखी एक बळवत्तर करण हें आहे कीं शरीरास त्यांवरून मोठ मो विकार होतात. परंतु ज्यांच्या अंगीं दुर्व्यसनें जडले असतात त्यांस हें कारण वाटत नाहीं, कारण तेणेंकरू आपल्या प्रकृतीस विकृति होते असें त्यांस वाटतच नाहीं तथापि सुधारलेल्या देशांतील सर्वोत्कृष्ट वैद्यांच्या अनुभवावरू

अशी साक्ष देतात कीं, अमली पदार्थांचें सेवन केल्यानंतर खचित रोग उत्पन्न होतात, झणजे शरीराच्या ज्या ज्ञान रज्जूंस त्या पदार्थांच्या सेवनें करून अल्प काळ समाधान होतें येवढें नाहीं, तर भयंकर व केव्हां केव्हां प्राणघातक रोग होतात. या व्यसनाचे परिणाम लवकर दृष्टोत्पत्तीस येत नाहींत शरीर प्रकृतिची घटणाच असी आसे कीं तिला पुष्कळ दिवस दुःख काढितां येतें, आणि रोग झाडून टाकून अरिष्ट टाळवेल तितकें टाळतां येतें. पण वृक्षास कीड लागली झणजे ती जसी. कोणाच्या पहाण्यांत न येतां त्याचें खोड खाऊन खाऊन पोकळ करिते, आणि बाहेरून वृक्ष खासा टवटवीत दिसतो व वाढतही जातो, पण शेवटीं ती कीड गाभ्यांत जाऊन त्याचें जीवन नष्ट करते व वृक्ष मरूनच जातो. त्याच प्रमाणें कैफी पदार्थांचें सेवन करणाराच्या शरीरांत रोग उत्पन्न झाला तरी तो पुष्कळ दिवस उघडकीस न येऊन त्या मनुष्याची प्रकृति चांगली दिसते व त्यालाही वाटतें कीं आपण अगदीं निरोगी आहोंत, पण शेवटीं तो रोग बळावून इतका अनिवार होतो कीं, त्याची प्रकृति अगदीं बिघडून तो प्राणास मुकतो. आणि असें झाल्या शिवाय राहवयाचें नाहीं. शुद्ध हवा, शुद्ध पाणी, व स्वच्छ अन्न हीं शरीराचें पोषण व जिवाचे रक्षण होण्याकरितां परमेश्वरानें नेमिलीं आहेत. धुरकट व कोंडलेली हवा, आणि खराब दुर्गंधी पाणी सतत पोटांत गेल्यानें फुप्फुसास व जठरास विकार होतात, आणि त्यांवरून रोग उत्पन्न होतात. ज्यांस ही व्यसनें बहूत दिवसांपासून आहेत ते जर झटून प्रयत्न करून हीं सोडून देतील तर त्यांचें मोठें हित होईल. कारण

आपल्या उत्पन्नकर्त्याने आपणांस देह व आत्मा दिलीं आहेत तीं त्याच्या इच्छे प्रमाणें व त्यानें स्थापलेल्या नियमां प्रमाणें चांगल्या कामांत लावलीं तर त्याने निर्मल अंतःकरणाच्या मनुष्यास जसा आनंद होतो तसा दुसऱ्या कोणत्या गोष्टीवरून होणार आहे बरें ? ह्या गोष्टीविषयीं विचार करण्याचें तरुणांस तर फारच अगत्य आहे. ज्या वाईट संवयी नसल्यानें आपण निरोगी, सुखी, व परहिताच्या कामीं उपयोगी होणार त्या संवयी लावून घेऊन जन्मभर त्यांचें लालन करण्याच्या निरर्थक मोठ्या खर्चाची बाब ठेवावी ही किती लाजिरवाणी व वाईट गोष्ट आहे ! परंतु ह्या व्यसनांच्या परिणामाविषयीं कांहीं एक विचार न करितां हजारों लोक, व पुष्कळ प्रतिष्ठित गृहस्थ देखील हीं दुर्व्यसनें लावून घेतात हें पाहून दुसरे लोक अल्प वयांतच द्वाड संवयीच्या स्वाधी होतात. या रीतीनें हीं दुष्ट व्यसनें पिढीं पिढीं चालत येतात. ह्या वरून जी जमीन, पौष्टिक धान्यें व फळें पिकवून गरीब गुरीबांच्या पोषणाच्या व दुष्काळ रूप मोठ मोठालीं अरिष्टें दूर करण्याच्या उपयोगीं पडावयाची तिचे हजारो विघे अफू भांगा गांज्या, तंबाखू वगैरे जे मादक पदार्थ शरीर संपत्तीची जीवाची हानी कहणारे त्याच्या लागवडीनें गुंतले जाता दयाळू परमेश्वरानें जमीन मनुष्यमात्राच्या पोषणाचे उत्पन्न करण्याच्या उद्देशानेंच केली आहे कीं नाहीं बरें या गोष्टी विषयीं कोणाला तरी संशय वाटेल नाहीं. पण जे मादक पदार्थांचीं व्यसनें लावून त्यांतील प्रत्येक जण आपल्या उदाहरणानें व जमीन व्यर्थ कामीं गुंतविण्यास आणि शरिरांची व

वांची हानि होण्यास उत्तेजन देतात तर दुर्व्यसनाच्या व त्यांतील जें सर्वांहून लहान व्यसन त्याच्या देखील योगानें आपण केवढा अनर्थ करीत आहों, याविषयीं तरुणानीं विचार करून सावध व्हावें. जर ते हीं दुर्व्यसनें सोडतील तर ते निरोगी व सुखी होतील व सन्मान पावतील; आणि ह्या व्यसनांपासून आपण दूर राहिलों ह्मणून अंतकाळीं इश्वराचे फार उपकार मानतील

तंबाखूपासून वाईट परिणाम.

एकदां असें झालें कीं, एका शिल्पशाळेंत कित्येक अल्पवयी कारागीर आपापल्या कामांत गुंतलेले असतांही बेहद्द तंबाखू ओढीत होते असें पाहून मनांत अशी कल्पना आली कीं, तंबाखू ओढण्यापासून विचार शक्तींत कांहीं न्यूनता येते; किंवा बुद्धींत विपर्यास पडतो काय ? परंतु तंबाखू ओढण्याची सवय सर्वत्र फारच प्रचारांत असल्यामुळें तिजविषयीं अशी पृच्छा घेणें हेंही क्षणभर आश्चर्यकारकच होय. तंबाखूची प्रशंसा जागोजाग लिहिण्यांत सर्वत्र प्रसंगीं बोलण्यांतही केलेली आढळते, एवढेंच नाहीं; तर तंबाखू हा विचारवंतास आपले मनो विचार चितण्यास साह्यभूत मित्रच आहे असेही लेख पाहण्यांत येतात. तसेंच तंबाखू ओढण्याची सवय सर्व जगभर फैलावलेली आहे; ह्मणून त्याविषयी कांहीं विचार लिहिले असतील केवळ अप्रयोजक होणार नाहींत असें जाणून मीं आमच्या

वाचकांपुढें वरील शंकासमाधानार्थ हीं पुढील कांहीं उदाहरणें सादर करितोः -- प्रथमतःही गोष्ट पक्की ध्यानांत ठेविली पाहिजे कीं, कोणतेही प्रकारें अनुमान केलें तरी हें खरें आहे कीं, विचारशक्ति निर्बंधानुसारी (यौक्तिक) असून त्यास चेतना देणारा पदार्थ काय तो रक्तच होय. विचार करतांना मेंदूच्या कांहीं अणु रेणुसारख्या कणांचा भंग होत असतो, ह्मणून त्यास पूर्व स्थितीस आणण्याकरितां चेतना प्राप्त करणारें रक्त, ज्याचें अभिसरण सर्व शरीर भर चाललेलें असतें, त्यांतून यथायोग्य पौष्टिक तत्वें शोधून घेतलीं जातात, यावरून हें उघड दिसतें कीं, मेंदूची आरोग्यता, उपजीवन करणाऱ्या रक्ताच्या परिमितीस अनुसरून आहे. ज्या आपायापासून रक्तास नुकसानी पोंचते, त्याच कारणानें मेंदूच्या आरोग्यतेस व क्रियाशक्तीस इजा पोंचते. तंबाखू ओढण्या पासून रक्तांत होणारे फेरफार स्पष्ट उदाहरणांनीं दृष्टोत्पत्तीस आणले ह्मणजे वरील प्रश्नाचें उत्तर देण्यास चांगलें साधन होईल. यांत संशय नाहीं. वैद्यकांत जशी निदान किंवा रोग निरूपण विद्या आणि प्राणिगुण धर्मशास्त्र यांची साम्यता आहे, तशी दुसऱ्या कोणत्या प्रकरणाची नाहीं. तंबाखू ओढण्यापासून रक्तांत होणारें स्थित्यंतर स्पष्ट रीतीनें दाखवितां ना, डाक्टर रिचर्डसन् याणें तत्संबंधी लिहिलेला मजकूर येथें उतरून घेऊं या, डाक्टर रिचर्डसन हे महानुभवी व विख्यात विद्वान् असल्यामुळें, त्यांचें ह्मणणें अगदीं विश्वासनीयच मानलें पाहिजे. तसेच तंबाखू ओढणारानेंही पर्व ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं, त्यांचें लिहिणें फक्त तंबाखूसंबंधीच आहे. एकसारखा सतत तंबाखू ओढल्यानें रक्तांत

होणारे फेरफार चांगल्या रीतीनें दिसण्यांत येतात रक्त हा प्रवाही पदार्थ पूर्वस्थितीहून पातळ व फिकट होतो, व त्याचा फिकटपणा कित्येक मनुष्याचे त्वचेसही भिडतो, तेणेंकरून त्यांचे सर्वांग फिकट, पिवळट, व जरट दिसूं लागतें. अशा स्थितींत त्यांचे त्वचेवर एकादा घाय पडला तर फार पातळ झालेलें रक्त त्या घायांतून मनस्वी वाहूं लागतें, व कधीं कधीं तें औषधानें देखील बंद होत नाहीं; परंतु या पेक्षांही विशेष महत्वाची गोष्टही आहे कीं, रक्ताच्या अणुरेणु सारख्या तांबड्या कणांत ही पालट होतो. हे कण वर्तुळाकार, व दोहों बाजूंनीं कटाहाकृति असून त्यांचा किनारा सुळसुळीत असतो. ते क्षारगुणी औषधांत विरघळून, त्यांचे आकृतीचा व गुणांचा पालट होतो; यामुळें रक्ताचे घनत्वांत अंतर पडतें, तंबाखूचा धूर रक्तांत मिसळला असतां त्या प्रवाही पदार्थांत फेरफार होतो. रक्ताचे तांबडे कण जे आरोग्य स्थितींत एक वेळीं वाहत असतात, ते विसकळीत होऊन वाहूं लागतात, व त्यांचा वर्तुलाकार जाऊन ते लांबट व आबड धोबड होऊन जातात, ते कण अशा दशेप्रत पावल्यानें असें स्पष्ट दिसून येतें कीं ज्याच्या शरीरांतून ते काढलेले आहेत तो मनुष्य कमकुवत, निस्तेज व उदासीन असतो. तंबाखू जसा दुसऱ्या इंद्रियांच्या रक्त प्रवाहांत पालट करितो तसाच मग ज्याच्या रक्तप्रवाहांतही पालट करितो, यामुळेंच तो विचारशक्तीवर आपला अमल बसवितो हें उघड आहे मोशोमुनीअर नामे एक फ्रेंच गृहस्थ असें ह्मणतो कीं, तंबाखू ओढणारांपैकीं निरभिमानी व सुविचारी मनुष्यें असें सहज कबूल करितील कीं तंबाखूच्या

उपयोगापासून काम करण्याची शक्ति न येतां केवळ स्वप्नवत् अवस्था मात्र होऊन प्रकृत बदलून जात असते. त्यांनेंच लिहिलेले तंबाखू विरुद्ध वादविवाद फारच सुरस व मनोरंजक आहेत; परंतु फार वर्षे जडलेली सवय एकदम सोडणें फार कठीण असेंही त्याचें ह्मणणें पडतें काम करतांना तंबाखू ओढण्याची फार सवय असल्या कारणानें मानसिक व्यायाम करितांना किती तंबाखू नासला याची गणती करून ठेविली आहे. ज्या संवयीनें त्यास अगदी पाशबद्ध करून टाकलें होतें, ती सवयी सोडण्यास त्यास कित्येक दिवस एकसारखे लक्ष्यपूर्वक महान् प्रयत्न करावे लागले.

नायकोटीत (तंबाखूचें तल) रक्त वाहिन्यावर कोणत्या प्रकारें व्यापार करितें हें कळलें असतां तंबाखूपासून इंद्रियांवर होणारी चेतना सहज ध्यानांत येईल. तंबाखू पासून रक्तवाहिन्यांच स्नायुआकुंचन शक्तीस, अवश्य असलेलें उत्तेजन लवकरच नाहींसे होऊन, त्या वाहिन्या शिणून कमजोर होतात. मागें सांगितलेंच आहे कीं विचारशक्ति मगजांत वाहणाऱ्या रक्ताचे परिमितीस अनुसरूनच असते. याजकरितां तंबाखूचे सवयीनें रक्तवाहिन्यांचे स्नायु क्षीण व कमजोर होतात, तेव्हां रक्त पूर्वी प्रमाणें न वाहतां मंद प्रमाणानें वाहूं लागतें, यामुळें मग जाची धमक कमी पडते, परंतु आणखी ही तंबाखू ओढला असतां स्नायुआकुंचनास पुनः उत्तेजन येतें, रक्त लवकर वाहूं लागून त्या परिमाण मग जास्त होत जातें यामुळें क्षणिक विचार वा चट होतात; परंतु ती तार एकदां निघून गेली ह्मणजे नांत आलेले मोठमोठे विचार नाहींसे होऊन, ते विच

वाढविणारें यंत्र (मगज) पुनः क्षीण व कमजोर होते. त्यास मातब्बरीनें वरचढ गति देण्यास पुनः पुनः अधिकाधिकच तंबाखू ओढावा लागतो.

तंबाखूपासून मगज्यावर होणाऱ्या अपकारामुळें स्मरणशक्तींतही न्यूनता प्राप्त होते. 'लसमानडस' पत्राचा प्रख्यात कर्ता आबे मायग ह्या विषयीं अशी गोष्ट लिहितो कीं, त्याला तपकीर ओढण्याची अतिशयितच चट होती, ह्मणून त्याचें काम नीट चालेनासें झालें. तो केव्हां केव्हां ती न ओढण्याविषयीं प्रयत्न करी; परंतु त्याला ती चटक निखालस सुटेना. सन १८६१त तो कांहीं गणित प्रकरणांत गुंतला असतां दररोज विसपासून पंचवीस ड्राम (दोन अडीच तोळे) तपकीर ओढीत असे. याचा परिणाम असा झाला कीं त्याची स्मरणशक्ति दिवसें दिवस कमी होत चालली. त्याला कित्येक भाषा येत होत्या, व त्या प्रत्येक भाषेंतील १२०० पासून १५०० पर्यंत शब्द त्यास माहीत होते. परंतु पुढें त्याची स्मरणशक्ति कमी होत गेल्यामुळें ते शब्द त्यास सुचत नाहींसे झाले. याकरितां नेहमी कोशांची मदत घेणें त्यांस प्राप्त झालें. ही गोष्ट मनास लागल्यावर त्यानें तपकीर आणि विडी (चिरूट) न ओढण्याचा निश्चयच केला. सहा वर्षे तंबाखू सोडल्या नंतर तो लिहितो कीं, माझी शरीरसंपत्ति, चित्तवृत्ति आणि विचारशक्ति यांचा जणूं काय पुनर्जन्मच झाला असें मला वाटूं लागलें. माझ्या कल्पना निर्मल व तर्क सोज्वल झाले. काम हलकावलें लेखणी जलद चालूं लागली, व पूर्वी जे मी शब्द विसरलों होतों त्यांच्या मालिकांच्या मालिका माझ्या स्मरणशक्तिपुढें येऊं लागल्या, सारांश माझी

स्मरणशक्ति पूर्ववत्‌च झाली. यावरून तपकीर स्मृतीचा धडधडीत दुसमान होय, तिने आपल्या ओळखीचे कित्येक गृहस्थांस हळुहळु नाहींसे केलें आहे ह्याविषयीं खात्री करणें नको. प्रख्यात रसायन शास्त्री मोशडेब्रनफंट हा ही ह्या प्रकारच्या संकटांत सांपडला होता परंतु त्याणें तंबाखू वर्ज केल्यामुळेंच त्याचा बचाव झाला. जे कोणी या वस्तूची चटक लावून घेतात त्यांस त्यापासून कांहीं तरी अपकार झाल्यावाचून राहत नाहीं कारण लोक त्याचा खरा उपयोग न करितां बहुधा अतिशयोक्तिच करून टाकितात.

स्मरणशक्तिची उत्पत्ति मज्जा तंतू पासूनच उद्भवते ह्मणून जे कारण मज्जा तंतूंस अपकार करितें तेंच कारण स्मरणशक्तीसही हीनत्व आणितें

तंबाखू ओढणाराची स्मरणशक्ति कमी होणें हें मज्ज तंतूंचे व्यवस्थेंत विकार झाल्याचें चिन्ह होय व याच कार णामुळे दुसऱ्या कित्येक व्याधि उद्भवतात. इंद्रियज्ञा उत्तरोत्तर मंद होत जाऊन बुद्धीसही भ्रम पडत जातो.

ब्लांटि नामें एका ग्रंथांतून अशा प्रकारची अनेक उ दाहरणें उतरून घेतलीं आहेत, एम. एक्ष. ४० वर्षांचा याचा, सुदृढ प्रकृतीचा, आणि दिसण्यांत अगदीं निरोग असा होता तरी त्यांस तंबाखू ओढल्यानंतर बोलतां वारंवार अडखळण्याची अदत असे. एके दिवशीं ह निर्वात असून सूर्य चांगला प्रकाशीत झाला असतांही त्या असा भास झाला कीं, मोठा झुंझाट वारा सुटून पावसा मोठी सर आपणाकडे येत आहे, त्यानें आपला हात केला; परंतु त्याजवर पावसाचा एकही थेंब पडला ना किंवा त्याच्या अंगांतील वस्त्रें भिजलीं नाहींत त्या वे

त्याची छाती धुडधुडूं लागली होती. जी विडी (चिरूट) तो ओढीत होता ती त्यानें उडवून टाकीतांच त्याच्या छातीचें धुडधुडणें बंद पडलें, व तो त्याची स्वभावस्था नाहींशी झाली, पुढें अशा प्रकारचे त्रास कित्येक वेळां झाले. ह्मणून त्यानें तंबाखू ओढणें सोडून दिलें. तेव्हां त्याचे बुद्धीस भ्रम होणें बंद पडलें. आतां आपण केवळ निरोगी झालों असें त्यास वाटून त्यानें पुन्हा तंबाखू ओढण्यास प्रारंभ केला. मग तसें होताच त्याच्या छातीची धुडधुड व बुद्धीस भ्रमही एकदमच सुरू झालीं. त्या उपद्रवापासून सुटका करून घेण्यास्तव त्यास निखालस तंबाखू सोडावा लागला.

असे क्षणिक भ्रम होतां होतां त्यास लवकरच वेडही लागतें, एका ठिकाणीं असें लिहिलेलें आढळतें कीं, तंबाखूपासून एका गृहस्थास वेड लागलें होतें; परंतु दैवयोगे करून त्याची तंबाखू ओढण्याची तलफ बंद पडत जाऊन हळु, हळु, सवय मोडत गेल्यामुळें त्याची या वाईट परिणामापासून सुटका झाली.

रोग्यांच्या व्यवस्थेविषयीं विचार.

आजारी मनुष्याची सुश्रूषा करते वेळीं अशी योजना करावी कीं, तो ज्या खोलींत तें असेल तिचे दरवाजे उघडे ठेवोन त्याचें शरीर व खोली हीं अतिशय स्वच्छ ठेवावीं; रोग्याच्या अंगावरील पांघुरणें वारंवार बदलावीं, त्यास खाणें देणें द्यावयाचें तें अगदीं साधें असून थोडें थोडें देत जावें;

त्याच्या खोलीशीं गडबड व गोंगाट अगदीं होऊं देऊं नये, कोणत्याही मनुष्यास कसल्याही प्रकारचा वाईट ताप येऊं द्या, त्याची सुश्रूषा करण्याचीही साधी आणि उत्तम युक्ती सुरळीतपणें एकसारखी जर चालू ठेविली, तर तिजपासून बरा होणार नाहीं असा मनुष्य विरळा.–ताप आणि दुसरे सांतींचे रोग यांपासून उत्पन्न होणाऱ्या ज्या विषयुक्त वाफा त्यांचा जोंपर्यंत भर असतो तोंपर्यंत त्या फार भयंकर असतात, परंतु त्यांजवर ईश्वरनिर्मित जे उपाय आहेत ते सुरू ठेविले असतां त्यांची शक्ति फार वेळ राहत नाहीं स्वच्छ हवेपुढें विषारी वाफांस क्षणभरही राहवत नाहीं आजारी मनुष्याच्या तोंडांतून वाफा निघत आहेत तोंर जर त्या स्वच्छ हवेशीं मिश्रित झाल्या तर लागलीच त्यांचे विषारी शक्ति नाहींशी होते. तापाची सांत श्वासोश्वास एक मनुष्यापासून दुसऱ्यास न बाधावी, ह्मणून ज्या खोलीत आजारी मनुष्य असेल त्या खोलींत स्वच्छ हवा नेहमीं खेळती ठेविली ह्मणजे बस आहे. अतिशय भयंकर तापा आजारी झालेलीं मनुष्यें ज्या खोल्यांत असतील, अशा खोल्यांचे व त्यांच्या खिडक्यांचे दरवाजे जर नेहमीं उघडे ठेविले, आणि आजारी मनुष्यानें सोडलेला उच्छ्वास स्वच्छ हवेंतून साहा हातांच्या अंतरावर गेल्या वांचून न घेतला, तर त्या आजारी मनुष्याची देख रेख ठेवणारांस किंवा त्याच्या भेटीस आलेल्या कोणा मनुष्यास त्या खोलींत निर्भीड पणें राहण्यास हरकत नाहीं.– स्वच्छ हवेच्या योगानें शरीर सशक्त आणि निरोगी राहतें. ही सृष्टिकर्त्यानें रोगांवर उत्तम मात्राच करून ठेविली आहे. ही सर्वोत्तम वैद्यकी सर्वोत्तम औषधें असून तीं फुकट दिलीं आहेत. ही ज

नें दिलीं औदार्य व चातुर्य यांहींकरून परिपूर्ण आहे:–

कुटुंब वैद्य.

कुटुंबां मध्यें लहान सहान अपघातामुळें लहान मोठ्यांस या संसारांत नित्याच्या वर्तनामध्यें अनेक पीडा होत असतात; त्यांचें निवारण योग्य काळीं योग्यरीतीनें व्हावें, वैद्याची मदत मिळेपर्यंत त्यापासून विशेष दुःख होणार नाहीं; अशा प्रकारचे कांहीं उपचार प्रत्येक मनुष्यास माहित असले पाहिजेत. ह्मणून त्यांपैकीं कांहीं सांगतों.–

१ शरीराची चिरलेली जखम चाकू, सुरी, (२ रें एखादा जड पदार्थ शरीरावर पडला असतां (३) जनावरानें बोचलेली अथवा हत्यारानें टोंचलेली अशा प्रकारच्या जखमेस उपाय:–

जखम धुऊन सुरक्षा चिंधीनें घट्ट बांधून चोवीस तास ठेविली असतां बरी होते. तसें न होतां सुजून तिच्यांत पू ह्माला तर स्टिकींगप्लास्टरची पट्टी लावावी. जखम मोठी असल्यास " आसीड कारबोलीक " तीस मिनिम एका शेर पाण्याच्या बाटलींत घालून जखम दिवसांतून दोन तीन वेळां धुवावी. आणि " सिंपल ऑइंटमेन्ट " ह्याची पट्टी लावावी.

कोणत्याही प्रकारचे जखमेस सामान्य उपाय. ब्रान्डी अथवा कोलेनवॉटर यानें जखम धुवावी आणि तेजवर एका पदार्थाच्या पट्ट्या लावाव्या. शरीराचे जळलेले

भाग बहुत करून लेकरांस जळण्याचें भय फार असतें
जो भाग जळलेला असेल त्यावर तेलांत कापड भिजवू
बांधावें किंवा पाण्याची पट्टी बांधल्यासही जळलेला भा
बरा होतो.

सर्पदंश—पहिला उपाय हा कीं, ज्या मनुष्याचे तोंडांत कांहीं
दुखापत किंवा जिभेला चट्टा वगैरे नाहीं, त्याकडून तें वि
चोखवून टाकावें; आणि दोन तीन इंचांच्या अंतरावर सुत
ळीचा बंध, बांधावा त्या बंधांत लांकडाचा तुकडा शिरवून घ
पिळण देववेल तितकी द्यावी. नंतर दंशस्थान पा
इंच खोल कापावें; किंवा नैट्रिक असिड लावावें. " म
रियाटिक आसिड " यांचे कांहीं थेंब त्यावर सोडावे ह
णजे तेणें करून दंशाचें विष नाहींसें होतें.

विंचवाचा दंश:—सोमल लावून शेकावें थोडेसें
घेऊन दिव्याच्या जोतीवर चांगलें कढवून त्याचा च
दंशावर बसवावा म्हणजे लागलाच वेग कमी होऊन दं
ची आग कमी होते.

सॉन टोनिआ:—हें औषध जंतास फार उपयोगीं अ
जंत झाल्यावर सांगितलें औषध लेकरास सुमारें गुंज
द्यावें आणि त्याच्या दुसऱ्या दिवशीं एरंड्येल तेल द्यावें.

क्लोरोईन:—हें औषध पोट दुखणें, जरिमरी हा
मोडोशी, खोकला, दमा, उलटी, शैत्य इत्यादि रोगां
फार उपयोगीं आहे, तें मोठ्या मनुष्यास सुमारें बीस
सून पंचवीस थेंब व दोन वर्षांच्या मुलांस सुमारें आठ
देत जावें. पेन् किलर: ह्या दु:खहारक औषधाची
डीशी माहिती सांगतों. या औषधाच्या बाटलीब
एक छापलेला कागद येतो. त्यांत हें औषध कोणत्या

गोंवर चालतें आणि कोणत्या रीतीनें द्यावें हें लिहिलेलें
असतें. आणि मला हें ह्याचा पूर्ण अनुभव आहे. हें
औषध बऱ्याच रोगावर चालतें. लहान बाटलीस दहा
आणे व मोठ्या बाटलीस सव्वा रुपया पडतो.

कार्बोलिकआसिड-हें एक बाटलीभर पाण्यांत तीस थेंब
टाकून खरूज धुवावी, किंवा मोऱ्यांत, संडासांत हें पाण्यांत
घालून टाकलें आसतां वाईट दुर्गंधि जाते.

खरजे करितां उत्तम मलम.१. सिंपल ऑइन्टमेन्ट १
औंस, ऑइन्टमेन्ट हायड्रॉजरी २ ड्राम, कार्बोलिक आसिड १५
मिनिम ग्लिसरिन अर्धाड्राम, आणि झिंकऑक्सीडाय १ड्राम.

२.सलफर म्हणजे गंधक एक गुंजभर घेऊन एक औंस
भर पाण्यांत टाकून चांगला हालवावा आणि निजतेवेळीं
खरजेस लावून ती सुकूं द्यावी नंतर कार्बोलिक सोपानें ती
दिवसांतून दोन तीन वेळां साफ धुवून टाकावी म्हणजे ती
बरी होईल.

३.एक तोळा गंधक, मिरी दोन, तोळे, हरताळ साहा मासे
मोरचूत तीन मासे ह्यांचे मिश्रण करून घडी पडे तोंपर्यंत
कांटावें, नंतर गाईच्या लोण्यांत खलून खरजेस लावावें;
आणि विस्तवावर शेकावें.

जें पाणी आपण पितों त्यांत ही परमेश्वरानें फार गुण
ठेविले आहेत. डोकें दुखत असल्यास त्यावर थंड पा
याची पट्टी ठेवावी, तसेंच डोळे दुखत असल्यास त्यावर
अशीच पट्टी ठेवावी

सारांश, कुटुंबवत्सल मनुष्यानें अनेक औषधांचा संग्रह
करावा हें आवश्यक आहे, तसेंच अनेक औषधांच्या उ-
पोगाविषयीं आणि रोगी मनुष्याचा सांभाळ करण्याविषयीं

सर्व बंधुजनांनीं शक्त्यनुसार अभ्यास करावा. व खबरदारी राखावी ह्मणजे अशा अल्प स्वल्प रोगांचें सहज निवारण होईल.

मनुष्याचा अस्थिपंजर व त्याच्या रचनेची तुलना.

मनुष्याच्या अस्थिपंजराची रचना कशी आहे हें पाहून आणि मग त्यांत व कनिष्ठ वर्गांतील प्राण्यांच्या अस्थिपंजरांत काय फेर आहे ह्याविषयीं विचार करूं.

मनुष्याच्या शरीरांत निरनिराळीं हाडें सुमारें २१० आहेत; कोणीं ह्मणतात जास्ती आहेत. यांची संख्या नेहमीं सारखी नसते; तीं वयपरत्वें कमी जास्त होतात.

उदाहरणार्थ, उरोस्थि ह्मणजे उराचें हाड, याचे बाल्यपणीं आठ तुकडे असतात. तरूणपणीं ते जोडले जाऊन तीन तुकडे होतात आणि ह्मातारपणीं सर्वांचें एकच हाड होतें. हीं हाडें ध्यानांत धरण्यास सुलभ व्हावींत ह्मणून आपण त्यांचे चार विभाग करूं ते असे-धडाचीं हाडें, मस्तकाचीं हाडें, बाहूंचीं हाडें व पायांची (टांगांचीं) हाडें. या सर्व हाडांचा तपशील येणेप्रमाणें.

(१) धडाचीं हाडें.-

कण्याचे माणके	...
फांसळ्या	...
खालच्या पोटांची हाडें	... ४
उराचें हाड एक	... १
जिभेच्या बुडाजवळील हाड	... १
	५४

(२) मस्तकाचीं हाडें–

करटिचीं हाडें	... ८
कानांचीं हाडें	... ८
मुखाचीं हाडें	... १४
दांत	... ३२
	११६

१ धडाचीं हाडें—मागें सांगितलें आहेच कीं, मणक्यांच्या प्राण्यांच्या रचनेंत कणा हा विशेष आहे. तो शिरापासून धडाच्या खालच्या शेवटापर्यंत असून त्याचे २४ मणके आहेत. कण्यांची रचना बहुत अस्थि मिळून फारच चमत्कारिक रीतीनें झाली आहे. कणा किती कार्यांच्या उपयोगीं पडतो याचा विचार केला ह्मणजे त्याची रचना कशी आहे, हें चांगलें समजेल. १ बळकटी व शक्ति अवघें शरीर कण्याच्या आधारावर आहे, ह्मणून कणा दृढ बळकट असण्याची आवश्यकता आहे. ह्या कारणाकरितां प्रत्येक मणक्याच्या भागाचा आकार बळकांड्यासारखा असून त्याच्या दोन बाजवा सपाट असतात व त्यांच्याशीं लागून वरचे व खालचे माणे असतात त्यांच्याशीं तो मणका बंदांनीं घट्ट बांधलेला असतो. हे कण्याच्या एका शेंड्यापासून दुसऱ्या शेवटापर्यंत त्यांच्या वर व त्यांच्यामध्यें असून येणें करून सर्व माणे

परस्परांशीं घट्ट बांधून टाकलेले आहेत २ लवचीकपणा. जरी अशी व्यवस्था केली आहे तरी याहून जास्त कांहीं कांहीं केलें नसतें तर कणा मजबूद व बळकट झाला अस तां, पण त्याच्या ठायीं लवचीकपणा आला नसता; ते एथून तेथवर एकाच हाडाचा असल्याप्रमाणें ताठर झाल असता. ही अडचण दूर व्हावी ह्मणून जेथें मणि पर स्परांशीं जोडलेले आहेत, तेथें त्यांच्या सांध्यांत कूर्चा ह्मट लेला एका प्रकारचा चमत्कारिक व स्थितिस्थापक ह्मणे तसा दबणारा व फुटणारा पदार्थ घातलेला आहे. ज कमानीच्या गादीवर टेकावें त्याप्रमाणें या पदार्थावर प्रत्ये मणि ठेंकलेला असतो, ह्मणून दरएक जोडाच्या ठिका पाहिजे त्या बाजूस लवणारा सांधा झाला आहे, आ त्यावरून कणा पाहिजे तिकडे वांकविता येतो. ३ ण्याची रज्जू, शरीरामध्यें एक प्रकारचा रस आहे इतका आवश्यक आहे कीं, चलनशक्ति व इंद्रियह होणारें ज्ञान हीं त्यावर अवलंबून आहेत. हा रस ए दोरींतून वहातो तिला कण्याची रज्जू ह्मटलें आहे. रसास जाण्यास कण्यामधून मार्ग मिळेल अशी कण्य रचना असावी हें आवश्यक असलें पाहिजे. हा रस इ नाजुक आहे व त्यास विकार होण्याची इतकी भीति कीं त्याजवर विशेष जोर पडला किंवा त्याच्या गतीस क अडथळा झाला तर लागलाच वात रोग होतो ह्मणजे गावरून वारा जातो किंवा मरण प्राप्त होतें. ह्मणून जो मार्ग पाहिजे तो त्याचा बचाव होई असा बंदोबस्त पाहिजे. वास्तव प्रत्येक मणक्यास तिरकस छिद्र (भ असतें, तें असें असतें कीं त्याची दोन्ही तोंडें व

खालच्या मण्यांच्या छिद्रांशीं बरोबर जुळतात. याप्रकारें एथून तेथवर एकसारखा नळ होऊन त्यांतून कण्याची रज्जू गेली आहे, तिच्या संरक्षणार्थ चौफेर भरीव हाडांचें आवसण आहे. (४) कण्याच्या रज्जूच्या शाखा, कण्याच्या रज्जू मधून जो रस जातो त्याची वाटणी अवघ्या शरीरामध्यें झाली पाहिजे. हें कार्य व्हावें ह्मणून मण्यांच्या प्रत्येक सांध्यांतून रज्जूच्या शाखा निघाल्या आहेत मणक्यांच्या मधील नळ व बाहेरील धार त्यांच्यामध्यें वर एक व खालीं एक अशा दोन खांचण्या असतात, त्या अशा रीतीनें कीं मणके एकमेकांशीं लागल्यानें ह्या खांचण्या मिळून भोकें झालीं आहेत, त्यांतून कण्याच्या रज्जूच्या शाखा गेल्या आहेत. ५ संधीचें संरक्षण. जर मणके कुर्चा व बंद यांच्याच योगानें जोडलेले असते तर त्यांच्या परस्परांवर वांकणाकडून कण्याच्या रज्जूस इजा झाली असती. वरचा किंवा खालचा मणि एकाच बाजूस अमळ सरकला तर त्या रज्जूस ताण बसून तिला मोठी इजा होईल. हें भय दूर व्हावें ह्मणून मणक्यांच्या दोहों बाजूंस खुंट्यासारखे फांटे असतात, ते एकमेकांत अशा रीतीनें बसविले आहेत कीं, तेणेंकरून सांध्यांच्या लवचीकपणास बाध न येतां मणि आपल्या ठिकाणांतून उखळून जाऊं नयेत ह्मणून त्यांचें संरक्षण होतें त्यांवरून त्यांची अशी मजबुती झाली आहे कीं, भरीव हाड मोडून जाईल एवढ्या जोराचा भार बसल्या शिवाय मणके आपल्या ठिकाणांतून कधीं ढळणार नाहींत. ६ फांसळ्या व स्नायु यांस आधार, मणक्यांच्या दोहों बाजूंस दुसरे फांटे आहेत तेणेंकरून फांसळ्या व धडांतील स्नायु यांस आधार मिळावा अशी

ही योजना केली आहे. त्या फांड्यांस फासळ्या बंदांनीं जोडल्या आहेत. ह्या जोडांच्या ठिकाणीं संधी आहेत. स्नायु ही दोर किंवा जाड बंद यांकडून मणक्यांच्या फाड्यांस बांधल्या आहेत. (७) डोल्यांतील मेंदूचें संरक्षण मस्तकांतील मेंदु हा सर्व मज्जातंतूचें मूळस्थान आहे ह्मणून त्याला इजा होण्याचें मोठेंच भय आहे. जर कणा नीट सरळ असता तर चालतांना त्यास थोडा धक्का बसल्यानें त्यास एकदम मोठा हांसडा बसून मेंदुच्या नाजूक वचनेस फार इजा झाली अलती; कण्यास दोन ठिकाणीं बांक आहे ह्मणून तो पोलादी कमाणिप्रमाणें स्थितिस्थापक (लवचीक) झाला आहे. या कारणानें, जो धक्का चालतांना, पळतांना, व उडी मारतांना बसतो तो चोहोंकडे वांटला जाऊन कमी होतो आणि मेंदूस कांहीं इजा पोंचत नाहीं.

या प्रमाणें कण्याची चमत्कारिक रचना व योजना केली आहे. शरीराच्या ह्या एका भागाच्या योगानें परस्परांपासून भिन्न अशीं किती कार्यें होतात ? यावरून सृष्टिकर्ता जो परमेश्वर त्याचें ज्ञान व चातुर्य किती आश्चर्यकारक व अतर्क्य आहेत हें उत्कृष्ट प्रकारें दिसून येतें. फांसळ्या— कण्याचे मणके २४ आहेत त्यांपैकीं वर मानेंत सात आहेत ह्मणून त्यास मानेचे मणके ह्मणतात. त्याच खालचे १९ मणके, पाठींत आहेत ह्मणून त्याला पाठीचे मणके ह्मणतात. पाठी या मणक्यांत फांसळ्या जोडल्या आहेत त्या उजव्या बाजूस १२ व डाव्या बाजूस १२ आहेत. फांसळ्याच पट्ट्या बाकदार आहेत व त्या सर्वांच्या लांबी सारखी नाहीं. धडाच्या बरच्या पोकळींत फुप्फु

व (हृदय) हीं आहेत ती पोकळी फांसळ्यांच्या आंत आहेत ह्मणून ती सुरक्षित राहतात. पहिल्या ७ फांसळ्या तिर्कस रीतीनें खालीं उतरून व पुढें येऊन उरास्थि ह्मणजे उराचें हाड यास जोडल्या आहेत, आणि शेवटल्या दोन फांसळ्याचीं टोंकें मोकळींच आहेत. फांसळ्याच्या योगानें धडाच्या वरील पोकळींचें संरक्षण होतें इतकेंच नाहीं तर श्वासोच्छ्वासाच्या कार्यासही मोठें साह्य होतें.

खालचें पोट-पाठीच्या माणक्यांच्या खालीं ५ माणि आहेत ते कमरेंत आहेत ह्मणून त्यांस कमरेचे मणि ह्मणतात. ते खालच्या पोटाच्या हाडांच्या आधारावर आहेत. खालच्या पोटाचीं हाडें चार आहेत त्यांपैकीं दोन मोठालीं असून चापट अहेत तीं बाहेरच्या व वरच्या आंगीं पसरलीं आहेत आणि धडाच्या खालच्या भागांतील पोकळींत जीं पचनेंद्रियें आहेत तीं यांच्याच आधारानें आहेत खालच्या पोटाच्या दोहों बाजूंच्या दोन्ही हाडांस पायांचीं कीं मांड्याचीं हाडें जोडलीं आहेत.

२ शिरोस्थि—मस्तकाचीं हाडें शीर हें ज्या सांध्याच्या योगानें कण्याच्या वरच्या टोंकांस जोडलेलें आहे तो सांधा असा आहे कीं, त्यावरून शीर पाहिजे तसें फिरवितां येतें. शीर हें बुद्धि व बहुतेक इंद्रियें यांचें स्थान आहे ह्मणून त्यांत बहुत हाडें आहेत. त्यांतील बहुतेक हाडांचा मुख्य उपयोग हा आहे कीं जीं नाजुक इंद्रियें आहेत तीं त्यांच्या आश्रयास आहेत त्यांचें संरक्षण व्हावें.

तस्तक किंवा करटी:—मस्तकाचीं हाडें आठ आहेत. त्यांत जी पोकळी झाली आहे तींत मेंदु आहे. हीं हाडें फारच कठीण व चिवट आहेत, हीं त्यांचे करवतासारखे

किनारे एक मेकांत बसवून जोडलीं आहेत. त्यांचा ज्यू-चा असा उत्कृष्ट रीतीनें जमला आहे कीं, सर्व मिळून जसें काय एकच हाड दिसतें. कठीण असा जोर असल्यावरून तिला इजा होण्याचें फारसें भय गाहीं; जर ती एकच हाडाच्या संबंधाची असती तर इतकी निर्भय झाली नसती बाळपणीं ह्या हाडांचे जोड फारसे जमलेले नसतात. त्याची टाळू किती मऊ व कोमल असत्ये हें पाहिलें असतां लक्षांत येईल.

पुढें मूल जस जसें वाढत जातें तस तसे ते जाड जमत जातात व बाराव्या वर्षीं पुरते जमतात.

कान—प्रत्येक कानास चार लहान लहान हाडें असतात. त्यांची रचना अशा रीतीनें केली आहे कीं जे शब्द किंवा नाद कानांत येतात ते त्याच्या साह्यानें आंतील पोंकळी मधून अचानक थेटपर्यंत जातात.

मुख—मुख किंवा चेहेरा यांचीं १४ हाडें आहेत. त्यांतून किती एक हाडें अन्न चावण्याच्या कामीं ज्या स्नायूंचा उपयोग पडतो त्यांस आधार देतात, आणि बाकीचीं हाडें चेहऱ्याच्या मृदु भागांचा आकार कायम राखतात. त्यांत वरील जाबाडांचीं दोन हाडें खालच्या जाबाडाचें हाड गालांचीं हाडें, तालूचीं हाडें हीं मुख्य आहेत.

दंत—दंत (दांत) हे शरीराच्या इतर हाडांहून किल्येक गोष्टींनीं निराळे आहेत. ते उघडे असून त्यांवर वातावरणाचा म्हणजे हवेचा व्यापार होतो. त्यांच्या उघड्या भागावर एक प्रकारच्या कठीण पदार्थाचा गुळ गुळीत थर किंवा गिलावा असतो, दांतांची संख्या सर्व काळ सा-

रखी नसती; बाळपणीं २० आणि प्रौढपणीं ३२ दांत असतात. दांत दोनवेळां निघतात. पहिल्यानें बाळपणीं निघतात, त्यांस दुधाचे दांत किंवा कच्चे दांत म्हणतात. ते थोडे दिवस राहतात. ते पहिल्या वर्षापासून तिसऱ्या वर्षापर्यंत निघतात, आणि साहव्या वर्षापासून चौदाव्या वर्षापर्यंत पडतात. त्यांच्या मागून जे दुसरे दांत येतात त्यांस पक्के दांत म्हणतात. सर्व दांतांचे आकार सारखे नसतात, त्यांचे आकार त्यांच्या कार्याप्रमाणें किंवा उपयोगाप्रमाणें असतात. पुढचे दांत तोडण्याकरितां आहेत म्हणून त्यांचा आकार कांहींसा वाकसाप्रमाणें असतो; सुळे विदारण्याकरितां व फोडण्याकरितां लागतात म्हणून ते सुरीप्रमाणें किंवा सुंड्याप्रमाणें असतात; आणि दाढा चगडण्याकरितां किंवा अन्न चावण्याकरितां पाहिजेत म्हणून त्या चापट असतात.

३ ऊर्ध्वशाखा—ऊर्ध्वशाखा म्हणजे बाहु हे, स्कंधसंधीनें अंस फलक (फार) व जत्रू (सरी) ह्या दोहों हाडांशीं जोडलेले आहेत. अंसफलक हें हाड छातीच्या वरच्या मागच्या आंगीं आहे. तें चापट, पातळ व त्रिकोणाकृति आहे, याच्या टोंकाशीं खांद्याजवळ बाहूचें हाड जोडलें आहे. जत्रु ही, उरोस्थीच्या शेंड्यापासून अंस फलकाच्या टोंकापर्यंत असून बाहूंच्या जोरानें खांदा पुढें ओढला जाऊं नये म्हणून इमारतीच्या कैचीप्रमाणें त्यास संभाळतो. बाहूंच्या वरील भागांत म्हणजे दंडात एकच हाड आहे त्यास भुजास्थि म्हणतात. तें लांब नळकांड्यासारखें आहे. बाहूंच्या पुढच्या भागांत म्हणजे हातांत दोन नळ्या आहेत; एकी बांव कुर्परास्थि. ती भुजास्थीशीं जोड-

ली आहे; दुसरीचें नांव मणिबंधा धारास्थि तीं मनगटाच्या हाडाशीं जोडली आहे. अशी व्यवस्था केल्यावरून हात व हाताचा पंजा हीं फार उपयोगीं पडावीं ह्मणून तीं लाटण्याप्रमाणें फिरवितां येतात. मनगटाच्या सांध्या खालीं ८ हाडें आहेत, त्यांस मणिबंधास्थि ह्मणजे मनगटाचीं हाडें ह्मणतात. त्यांच्या दोन आडव्या ओळी असून त्या बंदांनीं परस्परांशीं घट्ट, बांधिलेल्या आहेत. त्यांच्या योगानें हात पाहिजे तसा वळवितां येतो. यांपैकीं जी खालची ओळ तिला करांगुल्याधारास्थि नामें पांच हाडें जोडलीं आहेत. तीं लांब असून तळहाताच्या वरल्या शेवटापर्यंत ह्मणजे चारी बोटें व आंगठा त्यांच्या मुळांपर्यंत आहेत. पुढें त्यांशीं करांगुल्यास्थि ह्मणजे बोटें व आंगटा यांच्या पेरांचीं हाडें जोडलीं आहेत. एक एक बोटास तीन तीन आंगठ्यांस दोनच पेरें आहेत ह्मणून हीं हाडें १४ आहेत. आंगटा अशा रीतीनें बसविलेला आहे कीं, त्यास बोटांच्या समोरून जाऊन बोटांवर प्रयोग करितां येतो. ही व्यवस्था मनुष्याचे हातांत तर अगदीं पूर्ण रीतीनें केली आहे, यावरूनच मनुष्यास इतर प्राण्यांवर श्रेष्ठत्व प्राप्त झालें आहे. यांत ईश्वराचें ज्ञान, चातुर्य उत्तम प्रकारें दिसून येतें.

४ अधःशाखा—अधःशाखा (सांगा) व उर्ध्वशाखा (बाहूं) यांतील हाडें बहुत करून एकसारखींच आहेत. त्यांकडून जीं जीं कार्यें व्हावयाचीं त्यांच्या संबधानें मात्र थोडे फेर फार केले आहेत ते कसे हें तांगतों. जसें दंडांत भुजास्थि आहे या प्रमाणें मांडींमध्यें जें हाड आहे त्याला उर्ध्वास्थि ह्मणतात व तें खालच्या पोटांतील हाडा-

च्या योगानें घडाशीं जोडलें आहे, कोंपर व मनगटाच्या मध्यें कूर्परास्थि व मणिबंधाधारास्थि हीं दोन हाडें आहेत. त्या प्रमाणें पोटरीमध्यें अंतर जंघास्थि व बहिर्जंघास्थि हीं दोन हाडें आहेत; तीं गुडघ्यापासून घोंट्यापर्यंत आहेत. जशीं हाताच्या मनगटाचीं आठ लहान हाडें आहेत, तशीं पावलांचीं अंमळ मोठालीं ७ हाडें आहेत. तीं अशा रीतीनें बसविलीं आहेत कीं तेणें करून टांच व पावलाची कमाण झाली आहे. पांच पादांगुल्याधारास्थि व चौदा पादांगुल्यस्थि व करांगुल्यस्थि यांच्यासारखींच आहेत, ह्मणजे त्यांची संख्या व उपयोग बहुतकरून एकसारखेच आहेत. बाहूंमध्यें नाहींसें तांगमध्यें कायतें एकच हाड आहे कोणतें ह्मणालतर गुडघ्याची वाटी. ही वाटी गुडघ्याच्या सांध्याच्या पुढच्या अंगीं बसविली आहे त्यावरून तो साधा पक्का व फार उपयोगी झाला आहे तसा ही वाटी नसतीतर झाला नसता. या प्रमाणें मनुष्याच्या शरीरांतील अस्थिपंजराची रचना आहे तिजविषयीं जें जें संक्षिप्त वर्णन केलें आहे. त्यावरून दिसून येतें कीं, त्याचा प्रत्येक भाग ज्या उद्देशानें केला आहे तो पूर्ण व्हावा व तो मनुष्याच्य उपयोगीं पडावा अशाच रीतीनें घडला व बसविला आहे. यावरून मनाला किती आश्चर्य वाटतें.

इतर प्राण्यांमध्यें फेर—मणकांच्या सर्व प्राण्यांच्या शरीरांतील सांगाड्याची रचना बहुत करून मनुष्याचा अस्थिपंजरांसारखीच आहे त्या प्राण्यांच्या सर्व भागाची रचना सारखी आहे असें नाहीं; ज्या भागांची रचना एका जातींच्या प्राण्यांत एका तऱ्हेची केलेली आहे, तीच रचना दुसऱ्या अनेक जातींच्या प्राण्यांस दुसऱ्या प्रकारानें केलेली

आहे. यावरून त्यांचे आकार भिन्न भिन्न झाले आहेत; जीं हाडें मनुष्याचे शरीरांत आहेत, तींच इतर प्राण्यांच्या शरीरांत सांपडतांत, पण त्यांच्यांत हजारों तऱ्हांनीं फेर फार केलेले आहेत. ज्या ज्या स्थिति रीतीसाठीं जे प्राणी निर्मिले आहेत त्यांस योग्य असेच आकार वगैरे प्राप्त झाले आहेत. कित्येक प्राण्यांचे सर्व अवयव किंवा भाग परस्पर जुगतील असे असले पाहिजेत, ह्मणूनच कोणत्याहि प्राण्याचा एक भाग दुसऱ्या प्राण्यांच्या त्याच भागाहून निराळा केला, तर त्याचे बाकीचे सर्व भाग ही त्याच्या मानानें निराळे झाले पाहिजेत. उदाहरण—जर कोणाचा कोठा कच्चें मांस पचविण्यासाठीं असावा तसा केला तर मग त्याला आपला भक्ष्य धरून विदारण्याकरितां पंजे व नखें, त्यांचे मांस फाडून तोडण्या करितां तें खाण्या जोगता तोंडाचा जबडा, जें जनावर खावयाचें त्याचा पाठलाग करून त्याला आटोपण्या करितां धावण्याची शक्ति, आणि पुष्कळ लांबून त्याचा सुगावा काढण्या करितां, तीक्ष्ण इंद्रियेंहीं सर्व निराळ्या प्रकारचीं केलीं पाहिजेत. ही सर्व व्यवस्था इतकी नियमित व पूर्ण असते कीं, एखाद्या शास्त्रवेत्त्यास जर कोणत्याही प्राण्याच्या साऱ्या आकाराची जुळणी करतां येईल व त्याच्या साधारण चाली रीति सांगतां येतील

पाचनक्रियेस लागणारा काळ.

पाचन क्रियेस लागणारा काळ.—जसें अन्न असेल तसें त्याचें पचन होण्यास सुलभ असतें, ह्मणून त्याचें पचन होण्याला थोडा वेळ लागतो परंतु कित्येक प्रकारचें अन्न जड ह्मणजे पचण्यास कठीण असतें ह्मणून त्याचा परिपाक होण्यास फार वेळ लागतो. नाना प्रकारच्या भक्षणीय पदार्थांचे अनेक वेळां प्रयोग करून पाहिले, त्यावरून कोणत्या पदार्थांचे पचन होण्यास किती वेळ लागतो हें दिसून आले. त्यांतून कितीएकांविषयींचा तपशील पुढील कोष्टकांत दाखविला आहे.

पदार्थांचीं नांवें	पदार्थांची स्थिति	काल	
		तास	मिनिटें
तांदूळ	शिजवलेले.	१	०
साबूचे तांदूळ	शिजवलेले.	१	४५
अंडीं	कच्चीं.	२	०
,,	अर्धवट शिजवलेलीं	३	०
,,	पक्कीं शिजवलेलीं	३	३०
दूध	कच्चें.	२	१५
,,	तापविलेलें	२	१०
बटाटे	भाजलेले	५	३०
,,	शिजवलेले.	३	३०
चक्का पनीर	,,	३	३०
कोंबडीच्या पि. र.	,,	३	०
कालवें भाजलेलीं	भाजलेलीं	३	१५
कालवांचा रसा	,,	३	३०
टापिको	शिजवलेला	२	०
मटण (बकऱ्याचें)	,,	३	०
मटण (बकऱ्याचें)	भाजलेलें	३	१५
मटणाचा रसा	,,	३	३०
गाजरें	शिजवलेलीं	१	१५
मक्यांची भाकर	भाजलेली	३	१५
गव्हांची भाकर	,,	३	३०
तूप	,,	३	३०
कोंबडें	शिजवलेलें	४	०
बदक	,,	४	०

लोकांस बहुधा असें वाटतें कीं हलकें अन्न शरीर प्रकृतीस फारसें हितावह नसतें आणि जड अन्न बाधक असतें; पण अशी गोष्ट नाहीं. ज्या अन्नाचें पचन लवकर होतें, तें शरीरप्रकृतीस फारसें हितावह नसतें. ज्या प्रमाणें स्नायूस मेहनतीच्या व व्यायामाच्या योगानें शक्ति येतें; त्याप्रमाणें पचनेंद्रियांस असावे त्यापेक्षां जास्त श्रम पडल्यानें जशी इजा होते तशी कमी श्रम पडल्यानेंही होते; ह्मणून जर आपण नेहमीं हलकेंच अन्न खात गेलों तर हीं इंद्रियें दुर्बळ होतील. याकरितां आपली प्रकृति व पचनेंद्रियें यांस जसें व जितकें अन्न पाहिजे तसेंच व तितकेंच अन्न खाणें अवश्य आहे.

स्त्रियांच्या दुधांत जर १०० पौष्टिकांश आहेत असें समजलें तर दुसऱ्याभक्षणीय पदार्थांच्या ठायीं कितो पौष्टिकांश आहेत हें पुढील कोष्टकांत दर्शविलें आहे.

पदार्थांचीं नांवें.	स्थिती	पौष्टिकांश	
तांदूळ	शिजवलेले	८१	
बटाटे	,,	८४	
सलगम		१०६	
मक्का	,,	१०६–	१२५
गहूं	,,	११५–	१४४
गाजरें	,,	१५०	
वाटाणे	,,	२३९	
वाल वगैरे शेंगा	,,	३२०	
दूध	,,	२३७	
आंड्यांतील	,,	३०५	
पिवळा बिल	,,	८४५	
,, सफेत	,,	८५२	
बकऱ्याचे मांस	,,	७७३	
,,	कच्चें	,,	

वरील दोहों कोष्टकांवरून दिसून येईल कीं, जरी तांदूळ हलके आहेत तरी त्यांत पौष्टिकांश सर्वांपेक्षां कमी आहेत; यास्तव जे लोक फक्त तांदूळ खातात त्यांस शरीराचें पोषण पुरतें होण्याकरितां इतका पुष्कळ भात खावा लागतो कीं, त्यावरून त्याचा कोठा फार मोठा होतो मांसादिरूप अन्नाची गोष्ट तशी नाहीं, पोष्टिकांश वनस्पतींच्या अन्नांत

जितके असतात त्यांपेक्षां फार जास्त असतात.

स्वच्छता.

रोग होण्याचीं जीं अनेक कारणें आहेत, त्यांमध्यें मळीळपणा हें एक मोठें कारण आहे. सर्व संपत्तीमध्यें शरीर संपत्तिच श्रेष्ठ आहे असें सर्व लोक मानितात. तरी ती संपादन करून घेण्यास कोणते उपाय आवश्यक आहेत याचा विचार केला पाहिजे. आपणांस वरकड सर्व सुखें असलीं आणि आपलें शरीर व्याधिग्रस्त असेंल तर तीं सर्व सुखें व्यर्थ होतात ह्मणून या शरीराच्या आरोग्यरक्षणार्थ जपलें पाहिजे. मनुष्यास ज्या पीडा होतात त्या बहुधा मळीणपणापासून होतात, ह्मणून शरीरप्रकृति चांगली राखण्यासाठी निर्मळपणा हें एक मोठें साधन आहे, निर्मळपणा जरी लोकांस आवडतो तरी त्याकडे लक्ष देणारे लोक फार थोडे आहेत, आपण ज्या घरांत राहतों तें फारच स्वच्छ ठेविलें पाहिजे, कारण तें आपणांस सुख समाधान आणि आनंद होण्याचें केवळ मूळस्थान होय, वारंवार घर झाडून निर्मळ ठेवित जावें, घराची जमीन उखळूं देऊं नये. ती वारंवार सारवीत जावी, घराच्या भिंतींवर मुलांस शाईच्या, खडूच्या किंवा कोळशाच्या रेघा ओढूं देऊं नये. आपल्या शक्तीप्रमाणें वर्षांतून एक दोन वेळां घराला चुना लावावा, कारण चुना लावण्याने घरांत प्रकाश जास्त पडतो आणि भिंतीहो सुंदर दिसतात. चु-

न्याच्या आंगीं गुण फार हितकारक आहे तो असा कीं, घरांमध्यें जी वाईट हवा होते तेणेंकरून घरांतील मनुष्यांस रोग प्राप्त होतो तो चुन्याच्या योगानें होत नाहीं. घराच्या भिंती मळकट, जिकडे तिकडे केर व घुशींचीं बिळें वगैरे असलीं तर त्यांपासून वाईट हवा होऊन घरांत राहणारांस तिजपासून फार इजा होत्ये.

घर लहान किंवा मोठें असो तें स्वच्छ ठेविण्यासाठीं नीट व्यवस्था असली ह्मणजे पुरे आहे, भलत्या ठिकाणीं स्नान केलें, भलत्या ठिकाणीं तोंड धुतलें, किंवा आचवलें, असें करूं नये. सांडलें तेथें सांडलें, पडलें तेथें पडलें असेंहो होऊं देऊं नये. घरांत पाणी सांडलें असतां जमीन कुजत्ये आणि त्यापासून दुरगंधि निघून ती आमच्या श्वासोच्छ्वासा बरोबर पोटांत जाते आणि त्यापासून नानाप्रकारचे रोग होतात.

घरांतील सर्व वस्तू बरोबर आणि निर्मळ ठेविल्या नाहींत तर पिसा व ढेकूण यांची समृद्धि होते आणि त्यांच्या स्वाधीन घर झालें असतां रात्रीं मनुष्यें झोंपेत असतात त्यावेळीं ते आपला तमाशा कसा दाखवितात आणि त्यावेळीं तो पाहणारांची दशा कशी होते याचा अनुभव पुष्कळांस आहे याकरितां घर स्वच्छ ठेविण्याविषयीं जपावें.

घरांतील सर्व सामान जिकडचें तिकडे निर्मळ करून ठेवीत जावें. पुस्तकें फळीवर किंवा कपाटांत नीट नेटकीं रचून ठेवावीं आणि भांडींही फार स्वच्छ ठेवावीं. तांब्याच्या भांड्यांचा कलंक विषसमान असतो. तो पोटांत गेला ह्मणजे वांति होते, बहुतकरून सर्व भांड्यांस कल्हई देणें फार चांगलें आहे.

घरांतील सर्व प्रकारचीं वस्त्रें जिकडच्या तिकडे घड्या करून नीट ठेवावीं. अशाप्रकारें केलें असतां घर लहान असो किंवा मोठें असो, राहणारा श्रीमंत असो किंवा गरीब असो त्यास त्यापासून सुख होतें पुष्कळ आळशी बाया घरांतील मळीण पदार्थ फळांच्या बिया साली व उष्टीं खिडकींतून बाहेर फेंकितात यापमाणें पदार्थ घराच्या आसमंतांत टाकणें हें फार वाईट आहे. प्रातःकाळीं आपण उठून हातपाय व तोंड स्वच्छ धुवावें आणि साधेल तर प्रातः स्नान करीत जावें. स्नान करणें हें शरीरास फार हितकारक आहे, आपला देश उष्ण असल्यामुळें मनुष्यास घाम फार येतो त्यावर धूळ उडून ती शरीरास चिकटली ह्मणजे शरीर मळीण होऊन त्यांत इजा होते. याकरितां नित्य स्नान करण्याची सवय ठेवावी. तेणें करून आंग स्वच्छ होऊन रोमरंध्रें मोकळीं राहून घाम निघतो त्यानें शरीर हलकें होतें नंतर आळस जाऊन हुषारी येत्ये आणि अन्नही चांगलें पचन होतें.

शरीराच्या स्वच्छतेविषयीं आपले बहुत लोक इंग्लिशांची बरोबरी करितात परंतु पोषाख आंथरूण पांघरूण वगैरे वस्त्रांच्या स्वच्छतेविषयीं आपल्या लोकांपेक्षां त्यांचें लक्ष जास्ती असतें असें मला वाटतें. वस्त्रांकडून आमचें शरीर आच्छादित होऊन थंडीवाऱ्यापासून ही त्याचा बनाव होतो. वस्त्र हें आमच्या शरीरास भूषण आहे "एक नूर अदमी दसनूर कपडा "लाख नूर गईना कोटी नूर नखरा" अशी लोकांची ह्मण आहे, आपला पोशाख स्वच्छ आणि व्यवस्थित ठेवण्यासाठी नेहमीं जपावें. आंगावरचीं वस्त्रें जर मळीण ठेविलीं तर शरीराला जो घाम

येतो त्यांत त्या वस्त्रांचा मळ मिळून रोम रंध्रें बंद होतात आणि असें झालें असतां जो परिणाम होतो तो सांगितलाच आहे. मुलांस लहानपणापासून स्वच्छ राहण्याची सवय केली पाहिजे त्यांस जमिनीवर व मातींत खेळूं देऊं नये असें माझ्यानें ह्मणवत नाहीं. ती खेळल्या शिवाय आणि कपडे ही मलीन केल्याशिवाय राहणार नाहींत परंतु आईबापांनीं या कामीं आळस करितां कामा नये. त्यांस वारंवार धुऊन त्यांचे कपडे बदलीत असावें त्याचे रात्रीचे, दिवसाचे आणि बाहेरचे फिरण्याचे निरनिराळे असावे. त्यांस मलीन वस्त्रें घातलीं असतां तीं अशक्त, निर्बुद्ध, आळशी रोगिष्ट, आणि अनीतिमान्ही होतात. कियेक मुलें नाकांतील शेंबूड मनगटानें पुसून टिरीस किंवा आंगावरील कपड्यांस लावितात असलीं लेंकरें पाहण्यासही बरीं वाटत नाहींत. तर लेंकरांस स्नान घालून स्वच्छ ठेवावें. त्यांच्या मानेवर किंवा कानांच्या मागें नखांत अगदीं मळ सांचवूं देऊं नये. आणि तीं जमिनीवर खेळलीं असतां व जेऊन उठलीं असतां नेहमीं त्यांचे हात, पाय, व तोंड धुवीत जावें. त्यांच्या आंगावरील कापडांस वारंवार पाहत जावें जर तीं मळीण आहेत तर तीं बदलून दुसरीं घालावीं.

लेंकरांचा सांभाळ करण्याविषयीं आह्मीं जपावें हें आमचें कर्तव्य कर्म होय.

पैशाचा उपयोग.

आह्मी आपल्या द्रव्याचा कांहींएक उपयोग न करितां तसेंच बंद करून ठेविलें तर त्यांपासून आपणांस किंवा इतरांस काय लाभ होईल ?

कांहीं वर्षांमागें स्कातलंद देशांत एक मोठ्या कुलीन घराण्यांतील लार्ड पदवीचा द्रव्यवान् गृहस्थ राहत होता. त्याचें नांव लार्ड ब्रेको, जरी तो फार श्रीमान होता तरी फार कृपण व लोभी होता. आपला हिशेब ठिशेब ठेवण्याकरितां इतर सधन मनुष्याप्रमाणें कारकून ठेवींत नसे. तो फार उद्योगी होता ह्मणून हें अगदीं करीत असें, असें नाहीं तर. कारकुनाला जो पगार जाईल तो आपल्या पेटींत पडावा आणि अशा प्रकारें आपलें द्रव्य वाढावें हाच कायतो त्याचा मुख्य हेतु होता. जर कोणी त्याचें फुकट काम केलें असतें तर खुशाल दुसऱ्याला तें दिल्हें असतें. या गृहस्थाला नटे कीं कोणाला एक कवडी देखील देऊं नये या वरून वा त्याचा आणि पोटोबाचा उभा दावा आसेल असें वाटतें; पण करितो काय; या विषयीं त्याचा उपायच नव्हता! जें कांहीं द्रव्य मिळे त्याचें तो सोनें व रुपें खरेदी करून ठेवी. आणि हा सर्व माल एका मजबूत लोखंडाच्या पेटींत ठेवी.व ती पेटि एका मजबूत कोठडींत कड्या, कुलपें घालून ठेवीत असे.एकदां त्यानें एका शेतकऱ्याचें शेत आपल्याकडे गाहाणवट घेतलें होतें, तें सोडविण्याकरितां शेतकऱ्यानें सर्व रक्कम देण्यासाठीं, आणली होती; पण त्यांत सुमारें एक पैसा कमी होता हें पहतांच लार्ड ब्रेको ह्मणाला " तो पैसा दिल्याशि-

वाय मी या रकमेला शिवणार नाहीं." शेतकऱ्याच घर तेथून कित्येक मैल लांब होतें व एक पैसा मागण्यास कोणाकडे जावें; तथापि त्याजवळ बंदे रुपये होते त्यांतून त्यानें मोडून त्याचा पैसा दिला व त्या ब्रेको पासून पावती घेतली. नंतर शेतकरी ह्मणाला, " लार्ड ब्रेको, तूं आपलें सर्व द्रव्य दाखवशील तर मी यावद्दल तुला आठ आणे देईन." हें ऐकून ते रावसाहेब खुश झाले व कबुलही झाले. आणि हातीं किल्या घेऊन घर उघडून तें द्रव्य त्याला दाखविलें. शेतकऱ्यानें वचनाप्रमाणें आठ आणें काढून दिले आणि ह्मणाला, " लार्डब्रेको, ओ हो, मी आतां तुजसारखाच धनवान् आहे." हें ऐकून ते राजश्री चकीत झाले आणि ह्मणाले " अरे गृहस्था, हें काय ह्मणतोस, हें होईल तरी कसें ?" शेतकरी ह्मणाला " मी आपल्या डोळ्यानें हें सर्व द्रव्य पाहिलें, हा जो मला लाभ झाला तोच तुह्मांसही होतो. "माझ्यापेक्षां तुह्मांस अधिक लाभ तो कोणता? किंवा आपण श्रीमान् तरी कोणत्याप्रकारें आहां ? माझी या वेळची स्थीति एकसारखीच आहे कीं नाहीं ?'

वाचकांनों, हें त्याचें बोलणें योग्य होतें किंवा नाहीं ? जोंवर द्रव्य लपवून कुलपांत ठेविलें आहे, तोंवर त्या द्रव्यापासून मालकास किंवा इतरास काय लाभ आहे ? अर्थात कांहीं नाहीं. " असून दधात" या ह्मणी प्रमाणें तें निरुपयोगी आहे.

काटकसरीनें वर्तणें.

जो आपली प्राप्ति काय आहे आणि खर्च तो किती हें पाहत नाहीं, तो असें करण्यानें आपला संसार मोठ्या अडचणींत घालतो. द्रव्य मिळविण्या साठीं उद्योग करावा एवढेंच केवळ नाहीं. तर तें मिळविलें असतां आपण त्याचा सावधगिरीनें उपयोग करावा. या विषयीं ही आपण खबरदारी राखली पाहिजे. जर आपण पुष्कळ मेहनत करून द्रव्य मिळवितों आणि त्याचा अनाठायीं खर्च करितों तर उद्योग करण्यापेक्षां निरोद्योगी बसणें हेंच बरें. कारण तूस काढून हातास फोड किंवा डोंगर फोडून उंदीर काढणें असें मात्र होतें पुष्कळ लोक आपली सर्व प्राप्ति लवकरच खर्च करून टाकतात, आणि पुढें प्रसंग पडल्यास कर्ज काढून आपणावर संकट आणून ठेवितात; परंतु कर्जापासून किती वाईट परिणाम होतात हें त्यांच्या लक्षांत येत नाहीं. सारांश; ज्यास पैशाचा संग्रह कसा करावा हें समजत नाहीं. त्यांस कितीही मोठा पगार मिळाला तरी त्यांची तृप्ति कदापि होणार नाहीं. " आदायापेक्षां खर्च मोठा त्याचा होईल सदा तोटा." ह्या ह्मणीप्रमाणें पुढें त्यांस अनेक प्रकारच्या विपत्ति प्राप्त होतात.

कर्ज कोणीं काढूं नये असें माझें ह्मणणें नाहीं. याविषयीं मला थोडेसें माहीत आहे कीं कित्येक वेळां असे प्रसंग येतात कीं त्यावेळीं कर्जा शिवाय निर्वाह होतच नाहीं. परंतु कर्ज काढण्याचे दोन प्रकार आहेत. एक सार्थक आणि एक निरर्थक

कुटुंबांच्या संरक्षणासाठीं कर्ज काढणें तें सार्थक आणि त्या पुरतें मिळत असल्यास आपल्या मोठेपणा साठीं किंवा डामडौलासाठीं कर्ज काढणें, किंवा अविचारीपणानें एका रुपयाच्या ठिकाणीं दोन रुपये खर्चून कांहीं कृत्य करणें हें निरर्थक कर्ज समजावें.

१ कर्जदारांची स्थिति हमेशा भयाची असते आणि त्यांस वारंवार संकटें प्राप्त होतात.

(२) आपल्या गर्जेसाठीं आपण परिश्रम करून द्रव्य मिळवावें, हें जसें योग्य आहे, तसें आपण संपादन केलेल्या द्रव्याचा योग्य व्यय करण्यासही आपण फार जपावें हेंही योग्य आहे. द्रव्याचा लोभ सर्वांस आहे आणि तें मिळविण्यासाठीं पुष्कळ लोक श्रम करितात. दारूबाज आपली संपत्ति दारू पिण्यांत उडवितो. दारूमें गुंग झालेल्या मनुष्यास कोणताही काम धंदा सुचत नाहीं. दारूपासून काय काय वाईट परिणाम होतात ते खालीं लिहिल्या प्रमाणें.

दारू पिण्यापासून वाईट परिणाम.

नकारे नका दारूचा घोंट घेऊं ॥
नका जाऊंरे आग पोटास लाऊं ॥
नकारे नका जाऊं त्यांच्या दुकानीं ॥
हका मारिती द्यावया दुष्ट पाणी ॥ १ ॥
जिरे दारूनें अन्न ऐसें म्हणोनी ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

नकारे करूं आपली प्राणहानी ॥
पितीना भले सांगते काय मेले ॥
परि दारूनें शेकडों हानियेले ॥ २ ॥
नकारे नका दारूला घेऊं हातीं ॥
नका पीउनीं दाउ लोकां फजीती ॥
मुलां बायकां तूमची काय आशा ॥
जरी दावितां छाकट्यानें तमाशा ॥ ३ ॥
सुरा आणि सर्पीण ह्या सारिख्याची ॥
दुजी डंकुनी प्राण घेतील हेची ॥
सुराही पित्याच्या कुळालाहि जाळी ॥
मृतांच्या कुळालाचि लाऊनि काळी ॥ ४ ॥
नकारे म्हणूं दारूनें शक्ति येते ॥
कळेना तुह्मा रांडती रक्त खाते ॥
तुह्मां वाटतो दारूनें शीण जातो ॥
परी निश्चयें रोग पोटांत होतो ॥ ५ ॥
सुरा माउली वर्णिली पातकांची ॥
पितां सावली होय कैची सुखाची ॥
बळें आपुली हाण कांरे करावी ॥
सुरि खोऊनी ऊरि व्यर्थाचि घ्यावी ॥ ६ ॥
पितां दारूनें रोग होतो शरीरीं ॥
असें सांगती वैद्य सारे विचारी ॥
खिळे खाऊनी कोणरे सांग धाला ॥
सुरा पीउनी कोण नीरोगि झाला ॥ ७ ॥
नका दारूला अंगिकारूं कदापी ॥
बहूता तिणें पाडिलें नर्ककूपीं ॥
आखु, भांग गांजा आकूती तमाखू ॥

नका कारणावीण त्यांसींहि जाखूं ॥ ८ ॥

पिण्याशिवाय तर दिवस लोटतच नाहीं. यास्तव त्याला कर्जापासून दूर राहवत नाहीं. सारांश, मद्यपान केल्यानें दुष्ट रांडांच्या संगतीनें आणि जुगार वगैरे खेळ खेळण्यानें मनुष्य अन्नास देखील मोताद होतो. हें तुह्मांस ठाऊक असेलच ह्मणून या दुष्कर्माविषयीं फार जपलें पाहिजे.

३ आपल्या प्राप्तीच्या मानानें खर्च असावा; परंतु आपली जितकी प्राप्ति आहे तीं कधींही खर्चूं नये. सारांश " आंथरूण पाहून पाय पसरावे " या प्रमाणें लोक करितील तर ते खरोखर सुखी होतील अशी माझी खात्री आहे. शरिराच्या ह्या भागांचा निकट संबंध आहे अशी प्रमाणांवरून माझी खातरी होते. सात सात वर्षांनीं माझ्या शरिराच्या प्रत्येक परिमाणु बदलतो; परंतु जो मी, ज्या इंद्रिया विषयीं विचार करितों तो मी त्या इंद्रियापेक्षां निराळा आहे व माझें व्यक्तित्व मज्जेच्या व्यक्तित्वाहून निराळें आहे अशी माझी सर्वदा खातरी आहे.

देहात्मवाद

देहात्मवाद ह्मणजे मनुष्याच्या देहांत आत्मा ह्मणून कोणी निराळा नाहीं असें मत. हें मत कित्येक विद्वान लोक व पदार्थविज्ञान शिकणारे विद्यार्थी अविचारानें बागतात. ह्यांचे खंडन डाक्तर मकाश नामक महा विद्वान

तत्ववेत्यानें केलें आहे. त्याच्या निबंधाचें भाषांतर खालीं आहे.—

१ मन हें एक स्वतंत्र व्यक्ति असून अखंड आहे असें मला ज्ञान आहे; पण प्रकृतीचे अंश मिळून बनलेल्या पदार्थांविषयीं माझी अशी खात्री आहे मी डोळे उघडले ह्मणजे मला माझ्या पुढचे पदार्थ, ती टेंकडी, तें झाड, हे दिसतात. आणि त्यांस अस्तित्व आहे हेंही मीं जाणतों, परंतु त्यांना विशेष किंवा असाधारण व्यक्तित्व आहे असें मी मानीत नाहीं. ज्या परमाणूंनीं ते पदार्थ झालेले आहेत ते परमाणु नेहमी बदलत आहेत, अशी खातरी होते; व ते मोडून जाऊन त्याची माती किंवा चिखल असे दुसरे पदार्थ होतात. परंतु माझें व्यक्तित्व त्या टेंकडीपेक्षां व त्या झाडा पेक्षां निराळें आहे इतकेंच नाहीं, तर माझें बदलणारें शरीर ज्ञानतंतूचीं घरें आणि मज्जा ह्या पेक्षांही निराळें आहे माझ्या शरीराच्या ह्या भागांचा निकट संबंध आहे अशी प्रमाणावरून माझी खातरी होते. सात सात वर्षांनीं माझ्या शरीराचा प्रत्येक परमाणु बदलतो; परंतु जो मी, ज्या इंद्रिया विषयीं विचार करितों तो मी त्या इंद्रियापेक्षां निराळा आहे, व माझें व्यक्तित्व मज्जेच्या व्यक्तित्वाहून निराळें आहे अशी माझी सर्वदा खातरी आहे.—

२ मन नियमा प्रमाणें चालतें, ते नियम प्रकृतीस लागू नाहींत. प्रकृतीचे नियम हे आहेत—पदार्थ पदार्थास आकर्षितो; नियमित परीमाणानें प्रकृत्यंशांचा मिलाफ होतो; व घटित पदार्थांत समीकरण व प्राशन हे व्यापार चालतात. पदार्थाच्या नियमाप्रमाणें मनाचेही नियम नि-

श्चित व दृढ आहेत. पदार्थ जाणण्याच्या क्रियेमध्यें म नानें पाहिलेल्या पदार्थाच्या कोणत्याही धर्मापेक्षां निराळा धर्माचा तें उपयोग करितें. इंद्रियव्यवसायानें होणारें जें शरीराच्या आकृतीचें ज्ञान तें त्या आकृतीपेक्षां फार भिन्न असतें; ह्मणून आत्म्यास आपल्या सर्व व्यापारामध्यें आपणास सदोदित असणारें तत्व आहें असें ज्ञान होतें. स्मरण शक्तीच्या योगानें त्यास ज्या गतगोष्टी व पदार्थ त्या पुढें सांप्रत नसतात ते पुनः दिसतात; कल्पनेच्या योगानें वास्तविक स्वरूपापेक्षां अत्युत्तम असे नवे देखावे त्यास उत्पन्न करितां येतात; आणि विचाराच्या योगानें त्यास जें उत्तम व पूर्ण आहे, त्याप्रत पावतां येतें. कल्पनेच्या संयोगांतही शारीरिक नियमापेक्षां अधिक नियम आहेत. एका पदार्थाकडे पाहून त्या सारिख्या अनेक पदार्थांची कल्पना मनांत येते. प्रत्येक विचारांत दोन वस्तूंची तुलना असते, त्यांपैकीं आपणा पुढें एक नसो किंवा दोन्ही नसोत. आणि सूक्ष्म सादृश्याच्या योगानें आपणाला आपल्या गूढ विचारामय वस्तूंची तुलना करितां येते. " आरिस्टाटल याच्या काळापासून तर्क शक्तीचा धर्म ठाऊक झाला आहे व कांहीं मत भेद खेरीज करून या तर्क शास्त्राच्या नियमाविषयीं नय्यायिकांमध्यें विलक्षण ऐक्य आहे. सर्वांस मूळ भूत मत हें आहे कीं जे एका वर्गाविषयीं ह्मटलें जातें, त्या वर्गांतील प्रत्येकाविषयीं ह्मटलें जातें. किंवा नीतिशास्त्राच्या नियमाचें उदाहरण घ्या. पितृहत्ये सारख्या दुष्ट कर्माची कल्पना मनांत आली ह्मणजे तिचा मन धिःकार करितें, आणि असें सांगतें कीं न्यायश्रेष्ठ आहे ह्मणून त्याच्या स्वाधीन सर्व झाले पाहिजेत; पदार्थ

मात्रांच्या नेमांप्रमाणेंच मनोविकाराचे नियम राहिले आहेत उदाहरणार्थ बऱ्या वाईटाविषयीं आपल्या मनाचा जो पूर्व ग्रह असेल त्या प्रमाणेंच मनांत वृत्ती उत्पन्न होतात. स्वातंत्र्याचें ज्ञान, उपकारबुद्धि जबाबदारी हे जे मनोविकार ते गौण पक्षीं ह्मटले ह्मणजे मिलाफाच्या इंद्रियाविशिष्टरचनेवर अवलंबून आहेत, परंतु तेच मनोविकार ह्यां पेक्षां अतिशय श्रेष्ठ अशा प्रदेशापर्यंत जाऊं शकतात. हे नियम गुरुत्वाकर्षण, रसायनाकर्षण किंवा प्राणरक्षण समीकरण ह्यांच्या नियमप्रमाणें निश्चित व समर्याद आहे; परंतु हें नियम पदार्थ गति, परमाणु, विद्युत् लोहचुंबकार्षत्व किंवा प्राणरक्षण यांचे वायु वगैरेचे प्राशन नव्हे. तर आपणास एक वस्तु दुसऱ्या वस्तुहून जितकी भिन्न दिसती तितकेच हे नियम ह्या नेमाहून अगदीं निराळे आहेत.

विश्वास.

मानवी प्राण्याच्या स्थितीकडे थोडेंसें लक्ष पुरविलें असतां विश्वासाची अवश्यकता दिसून येते. विश्वासाशिवाय या जगांत व्यापार घडावयाचा नाहीं. एकमेकांची मैत्री होण्यास विश्वासच कारणभूत होय. मनुष्यांचे एकमेकांशीं व्यापार घडतात त्यांत विश्वास असतो अशी कल्पना केली आहे व तो असलाच पाहिजे. धनकोचा रिणकोवर अथवा गिऱ्हाइकांचा दुकानावर जो विश्वास असतो. तो नाहींसा होऊं द्या व राजकारणी पुरुषांचा परस्परांवर भर-

वसा व एका सरकारचा दुसऱ्या सरकारावर भरंवसा नसूंद्या, कीं लागलाच त्याजपासून जो मानवी प्राण्यांच्या व्यापारांत फेरफार होईल तो पूर्ण व विस्मयावह होईल. एका मनुष्याचा दुसऱ्या मनुष्यावर विश्वास नसला, तर एकंदर कोणत्या प्रकारची स्थिति होईल त्याचें अनुमान देखील करणें कठीण. सांप्रत असा प्रघात पडला आहे कीं, आह्मी आपली व्यापारसंबंधी कामें, आणखी मालमत्ता व कधीं कधीं आपला जीव देखील दुसऱ्यांच्या ताब्यांत देतों. जर विश्वास अगदीं नाहींसा केला तर आयुष्यासंबंधी कामांमध्ये मोठा घोटाळा होईल, तो निवारण करितां येणार नाहीं.

विद्यार्थ्यानें देखील ज्ञान संपादन करतांना विश्वासाचें सदोदित अवलंबन केलें पाहिजे. त्याला सर्व माहिती करून घ्यावयास पुस्तकें पहावीं लागतात; परंतु जीं पुस्तकें तो पठण करितो त्या पुस्तकांचे कर्ते शहाणे होते व जें त्यांनीं लिहिलें तें सत्य आहे असा त्याला भरंवसा ठेवावा लागतो. पूर्वी होऊन गेलेल्या विद्वानांनीं जे सिद्धांत करून ठेविले आहेत त्यांपासून तो शोध करावयास प्रारंभ करितो, व त्यांच्या सिद्धांतांच्या खरेपणावर विश्वास ठेवून तसाच पुढें नवीन अधिकाधिक शोध लाविंतो. पदार्थविज्ञानसंबंधी तो जे शोध लाविंतो ते स्वतंत्र असतात खरे, परंतु त्यांतही त्याला विश्वासाची अवश्यकता आहे; ह्मणजे ज्या यंत्राचा तो उपयोग करितो, तें असावें तसें यथास्थित आहे, व जीं पुस्तकें त्यास प्रसंगोपात्त पहावीं लागतात, तीं खरीं आहेत अशी त्याची खात्री असली पाहिजे. तर प्रत्येक विद्वान् मनुष्य दुसऱ्या विद्वानांवर विश्वास न ठेवितां पूर्वी

च्या शोधकांनीं केलेले सिद्धांत खरे आहेत असें स्वतां पाहण्याचें, अथवा जी सर्व पुस्तकें तो अवलोकन करितो तीं स्वतां मूलाधार तपासून पाहून बिनचूक आहेत असें खात्री करून घेण्याचें जोखीम आपल्या शिरावर घेईल, तर मानवी प्राण्यांची ज्ञानवृद्धीची सरणीबंद होईल. कारण पूर्वी होऊन गेलेले विद्वान भरंवसा ठेवण्यास पात्र होते असें खात्री करून घेण्यामध्येंच या विद्वानाचें सर्व आयुष्य निघून जाईल. एकदां विश्वासाचा लय होऊं द्या कीं, ह्या सर्व पुस्तक संग्रहालयांची आहुती अग्नीस द्यावी व ग्रंथ छापण्याचें काम बंद करावें असें होईल. कारण काय ह्मणाल तर पुस्तकांपासून फायदेशीर उपयोग होणें ह्मणजे त्या पुस्तकाच्या कर्त्यावर विश्वास असला पाहिजे.

सांप्रत जो विश्वास सर्व ऐहिक उद्योग धंद्यांत मोठ्या अगत्याचा आहे त्याजविषयीं व त्या विश्वासाच्या पाया- (कारण) विषयीं शोध करून विवरण करावें असा आमचा बेत आहे. प्रत्येक मनुष्याच्या विश्वासा कांहीं तरी कारण असलें पाहिजे. आमचा विश्वास केवळ निष्कारण व निराधार असेल तर तो देवभोळेपणा होय; फार तर काय! परंतु कारणव्यतिरिक्त विश्वास ठेवणें ह्मणजे डोळे मिटून रात्र समजल्याप्रमणें आहे. विचारी मनुष्य नुसता विश्वास बाळगून राहतो इतकेंच नाहीं तर त्या विश्वासाचें कांहीं तरी योग्य कारण ही असलें. अमुक विश्वासाच्या कृत्यास अमुकच एक नियमित पाया ह्मणजे कारण पाहिजे असें केवळ नाहीं, तर आपण आपल्या मानसिक व्यापाराकडे किंचित् लक्ष पुरविलें ह्मणजे आमची अशी खात्री होईल कीं आपल्या मनांतच सर्व प्रकारच्या विश्वासास

आवरणारे मुख्य नियम आहेत, आणि मोठा सबळ पाया ह्मणजे कारण ही आहे, आणि त्या पायावर विश्वाससंबंधी हरएक प्रकारचे व्यापार अवलंबून आले पाहिजेत; ह्मणजे विश्वास व त्याचा पाया आपल्या मनांतच आहे.

तूर्त या गोष्टींची चर्चा करण्यापूर्वी आपण तत्संबंधी थोड्याशा व्याख्यांच्या विचार करूं. विश्वास ह्मणजे काय, आणि ज्ञान ह्मणजे काय, व या दोहोंत कांहीं भेद आहे किंवा कसें, आणि असल्यास तो कोणता ?

एका मोठ्या महत्वाच्या बाबतींत ज्ञान व विश्वास यांचे मध्यें साम्यता आहे- या दोन्हीं गोष्टींपासून त्यांचा ज्या वस्तूशीं संबंध असतो त्या वस्तूंच्या खरेपणाची खातर जमा आमच्या मनांत उत्पन्न होये. जर एकादी गोष्ट एकादे मनुष्यास माहीत असली तर तो तिजविषयीं निश्चांत असतो, तसेंच जर तो एकादे गोष्टीवर विश्वास ठेवील तर तिजविषयीं ही त्याची खात्री असत्ये. परंतु त्यांत उत्तरोत्तर गोष्टींत खरेपणाच्या खात्रीचें परिमाण सदोदित सारखा नसतें; तथापि जर एकादा मनुष्य एकाद्या गोष्टीवर खरेपणानें व प्रमाणिकपणानें विश्वास ठेवित असला तर त्या गोष्टीच्या खरेपणाची थोड्या बहुतांशीं त्याची खात्री असेलच. त्यापेक्षां ज्ञान व विश्वास यांचा सत्येतेच्या खातर जमेंत समावेश होतो असें ह्मटलें असतां चिंता नाहीं परंतु ही खातरजमा ज्यावर अवलंबून असत्ये तो पायामात्र दोघांचा वेगवेगळा आहे. ज्या गोष्टी आपण जाणतों त्या गोष्टींची खातरजमा स्वतांच्या शोधावर किंवा स्वतांच्या अनुभवावर अथवा मानसिक क्रियेवर अवलंबून असत्ये. साखर गोड असत्ये हें आह्मांस ठाऊक आहे, कारण आ-

पण ती खाल्ली आहे; तसेंच मुंबई ह्मणून एक शहर आहे हेंही आह्मांस माहीत आहे, कारण तें आपण पाहिलें आहे. अग्नि उष्ण आहे व बर्फ थंड आहे व दुसरे अनेक पदार्थ अमुक तऱ्हेचे आहेत हेंही आह्मांस त्यांचा शोध केल्याअंतीं विदित होतें. ज्ञानाची जी दुसरीं कारणें आहेत तीं वस्तूंच्या बाह्यभागावलोकनावर अवलंबून नाहींत, तर ती एकादे गोष्टीच्या खरेपणाच्या मानसिक जाणिवावर अवलंबून आहेत. जसें, गणितशास्त्रांतील प्रत्यक्षप्रमाणें आपण खरीं आहेत असें मानितों. सरळ रेघ ह्मणजे दोन बिंदूंच्या मधील अगदीं जवळचें अंतर, हें खरें आहे असें आह्मांस बाहेरील अनुभवावरून ह्मणजे आंखणी घेऊन मोजल्यानें समजतें असें नाहीं, तर तात्कालिक ज्ञानाच्या योगानें सदरील प्रत्यक्ष प्रमाण खरें आहे व असलेंच पाहिजे असा भाव आपल्या मनांत तावडतोब उत्पन्न होतो; त्यावरून त्याचा खरेपणा आमच्या लक्षांत येतो कांहीं गोष्टींचे ज्ञान बाहेरील देखाव्यांच्या शोधावर असतें, त्याचप्रमाणें दुसऱ्या गोष्टींचे ज्ञान त्या गोष्टींच्या आंतील खरेपणाच्या जाणिवावर अवलंबून रहातें. या दोन्ही बाबतींत क्रिया आमची स्वतांचीं होय, आणि हेंच काय तें तूर्त आह्मी सिद्ध करावयास इच्छितों, आणि असा सिद्धांत करण्यास आह्मीं कोणाचीच मदत घेतली नाहीं; आह्मीं आपल्या डोळ्यांनीं पाहिल्यामुळें अथवा मनांत जाणल्यामुळें आह्मांस ज्ञान झालें,

आतां विश्वासाचा आधार अगदीं वेगळा आहे, तो ज्ञानाप्रमाणें थोड्या किंवा बहुतांशीं सत्यतेची खातर जमा होय हे खरें आहे, तरी त्याखातरजमेचा पाया अगदीं

वेगळा आहे.

उन्मत्तपणा.

उन्मत्तपणा—साधारणतः पुष्कळ लोकांस मोठमोठाले हुद्दे मिळाल्यानें किंवा सर्वोत्कृष्ट बुद्धि अथवा अचाट कल्पनिक शक्ति अंगीं असल्यानें अहंपणा किंवा गर्व प्राप्त होऊन ते उद्दामवृत्ति धारण करितात: असें जरी आहे तरी, यां सर्वांपेक्षां अंगीं उद्धटपणा आणण्यास संपत्तिच एक मुख्य कारण होय. संपत्तीच्या जोरावर गर्विष्ट होणें, हें अगदीं हलकट काम आहे, असें जरी सुज्ञजन मानितात; तथापि व्यवहारांत लहानथोर, उंच नीच, यांचा परस्पर भेद मनुष्यास संपत्तीच्या योगेंच कळूं लागतो. ह्मणून गर्वानें वागण्याला संपत्तिच मुख्य हेतु होय; असें जें पुष्कळांचें ह्मणणें आहे तें रास्त दिसतें. उद्योग व्यवसायांनीं भरभाराटीस आलेल्या कोणत्याही देशांत बहुतकरून मनुष्यें मिळकतीप्रमाणें ह्मणजे संपत्तीच्या वाढल्या मानाप्रमाणें अधिक उणीं गर्विष्ट असतात, दुसऱ्या कोणत्याही गोष्टींपेक्षां संपत्तिच श्रेष्ठ असें मानण्याची त्यांस सवयच लागून गेलेली असते. यांची प्रतीति नित्य व्यवहारांत दिसून येतेच. एकादा मनुष्य एकाद्या प्रसिद्ध समाजात जाऊं लागतांना पहावें तों आंत शिरतांच प्रथमतः उंच व मौल्यवान् भरजरी पोशाखाच्या मनुष्यांकडे आपली नजर फेंकितो, आणि त्यामध्यें जितके मातबर व प्रतिष्ठित असतील तित-

क्यांकडेसच तो लक्ष देतो. जे कोणी साधारण पोशाख करून आले असतील त्यांकडे तो पाहत नाहीं इतकेंच नाहीं, तर एकादा सधन नसून व्यवहारांत सर्वानुमतें जर तो थोर मानलेला नसला, तर तशा मनुष्याशीं देखील बोलण्यास त्यास लाज वाटत असते. त्याप्रमाणेंच एकादा संपत्तीनें त्याच्या तोलाचा नसला आणि जर कदाचित् त्याच्याशीं तो बोलण्याची सलगी करूं लागला तर हा त्यास तिरस्कारानें प्रत्युत्तर देतो आणि नाक मुरडून त्याविषयीं धिक्कार दर्शवितो.

गर्वाची उत्पत्ति संपत्तीच्याच योगें होत आहे हें ह्मणणें जरी आश्चर्य कारक दिसतें तरी हें नीटपणें जाणलें असतां यापासून बोध होईल यांत संशय नाहीं, यास्तव गर्विष्ट लोक आपणांस यापासून सुबोध करून घेतील तर यांत त्यांचें कल्याण आहे; परंतु असें कोठून होणार ! कारण संपत्तीचा गर्व प्राप्त होतांच प्रथमतः मनुष्याच्या चित्तवृत्ति पराकाष्ठेच्या असतात. साधारणतः मनुष्यास शें दोनशें रुपयांची नोकरी मिळाली असतां त्याच्या गर्वास पारावार नाहींसा होऊन जातो, व ह्या जगांत आपल्याहून श्रेष्ठ कोणी आहे असें त्यास वाटत नाहीं. मग हजारो रुपये मिळविणाराच्या स्थितीविषयीं तर पुसूंच नका. तेथें गर्वाची व त्याच्या इतर भावंडांची तर चढतीच कळा !! संपत्तीच्याच योगानें मनुष्यें गर्विष्ट होतात, हें जरी कबूल केलें, तरी संपत्ति मनांतही न आणणारा एखादा निगर्वी किंवा अति लीन वृत्तीचाही पुरुष आढळतो. तसेंच संपत्ति किंवा अक्कल व हूशारी यांतून कांहींच नसतांही अनेक पुरुष घुम्मे, उध्धट, मग्रुर व गर्वाच्या ताग्यानें सर्वकाळ

मुरडलेले, असे ही वारंवार पाहण्यांत येतात. गर्व व सुस्वभावामध्ये सर्वदा वैर असतेंच; परंतु जेव्हां सुस्वभावाचें वर्चस्व असतें तेव्हां त्यापासून चांगलेंच निपजतेंच. तरुण लोकांस विद्याभ्यासाबरोबरच गर्व प्राप्त झाला असला तरी ते एकक व्यवहारांत ठेंचा खाऊन थोडक्यांच वेळांत कांहींसे नम्र होतात. असा जो परिणाम होतो तो सुस्वभावाचा गर्विष्टांच्या आंगीं हलक्या गोष्टीची किळस नसते उलटे ते हलकट व अप्रशस्त आचारानें आपणास शोभवून घेतात.

आडिसनही असें लिहितो कीं " उत्तमप्रकारच्या बुद्धिमान् मनुष्यास एखाद्या मनुष्याची उपहास्यता किंवा हंसण्या लायक स्थिति दिसली. आणि ते त्यांची थट्टा करूं लागले ह्मणजे हे असें कां करितात असें पाहूं लागलों तर त्याचें मुख्य कारण गर्वच असला पाहिजे, अशी कल्पना होते. मी सर्वगुणसंपन्न आहें अशी कल्पना आपल्याठायीं होणें किंवा कुलीनता, संपत्ति अथवा किताबादि वैभव हीं दुसऱ्यापेक्षां आपणाला आहेत ह्मणून आल्हाद पावणें मानवी प्रकृति नाशाप्रत नेणारें सर्वप्रकारचें दुःख व व्याधी यांस आपण पात्र असतां व पाण्याचा बुडबुडा, काजव्याचा उजेड, व दोनप्रहरची सांवळी यांच्या सारखें शाश्वत ऐहिक सुख असतां, यांच्या गर्वानें फुगून शेजाऱ्याहून मी अनेक प्रकारें सुखी आहें असें मानून बेपरवाईनें ताठून जाणें हीं केवळ मूर्खपणाचीं लक्षणें समजावीं, शेवटीं तो ग्रंथकार आणखी असेंहि ह्मणतो कीं, या पृथ्वीच्या पाठीवर जितके प्राणी आहेत त्या सर्वांच्या स्थिती विषयीं शोध करून पाहिला असतां, उत्तम स्वभावाचे व

गुणी असणारे लोक, गर्व आणि मिथ्याभिमान यांचा सर्वदां धिक्कार करितात तो रास्त आहे.

या विषयीं आमच्या लोकांनीं व विशेषें करून तरुणांनीं सावध असलें पाहिजे. कारण, गर्व किंवा अहंपणा हा असा वाईट दुर्गुण आहे कीं, त्याच्या योगानें मनुष्यास आपले दोष न दिसतां जुसऱ्यांचीं छिद्रें मात्र काढितां येतात.

' झोनो नामें विख्यात विद्वानाचें असें ह्मणणें आहे कीं, कोणत्याही मनुष्यांत गर्व किंवा उन्मत्तपणा हा दुर्गुण असणें हें फार वाईट आहे. तशांत तरुणांच्या अंगीं असणें हें तर फारच लज्जास्पद होय.

आपल्या ठायीं जीं स्वाभाविक किंवा जडलेलीं व्यंगें असतात, तीं सद्गुणांनीं नाहींशीं करण्याचा यत्न अरितां उगेंच अहंपणानें तीं झांकण्याचा यत्य करणें हें केवळ मूर्खपण होय.

ज्यांस केवळ संपत्तीच्या योगानें गर्व प्राप्त झालेला आहे. त्यांस इतर सर्व गुणसंपन्नापेक्षां मानप्रतिष्ठा मिळविण्याची मोठी चाड असते.

कितीही संपत्ति प्राप्त झाली व कितीही ज्ञान प्राप्त झालें तरी हें आपलें जीवित्वच क्षणिक आहे अलें निरंतर मनांत बागवून अहंता गर्व व उन्मत्तपणा या ऐहिक व पारत्रिक हितशत्रूंचा अगदीं अव्हेरच केला पाहिजे. या विषयीं साधु रामदास व तुकाराम ह्मणतातः—

अहंभाव ज्या मानसीचा विरेना ।
तया ज्ञान हें अल्प पोटीं जिरेना ॥
अहंतागुणें सर्वही दुःख होतें ।

मुखें बोलिलें ज्ञान तें व्यर्थ जातें ॥ १ ॥
महापूरें झाडें जाती । तेथें लोहाळे राहती ॥ १ ॥
येती सिंधूच्या लहरी । नम्र होतां जाती दूरी ॥ २ ॥

आज्ञा.

साक्या.

१ देवाच्या नामाचा घोषाचे
व्यर्थ असे हो पाही
प्रेमावाचुनि करुणा त्याची
कदापि होताचे नाहीं.
२ निज मातेची तशी पित्याची
ठेवावी मर्यादा,
द्यावें सोडुनि जारकर्मची
तैसा वाईट धंदा.
३ चोरी करणें असत्य भाषण
खोटी साक्ष नको ती,
अन्यदार धन घेउनि भूषण
मानुं नका कल्पांतीं.
४ वाईट चिंतूं नको दुज्यांचे
कोणा दुःख न द्यावे,
शत्रूलाही क्षमा करुनियां
त्याचें हिताचि करावें.

५ धर्म अनाथा करुनी द्यावीं
वस्त्रें नग्न जनांना,
अन्न क्षुधितां द्यावें भावीं
पाणी तान्हेल्यांना.
६ आज्ञा गुरुची जो मानीना
शिष्य खरा तो नाहीं,
त्याच्या वरती कृपा गुरूना
करणें होईल काई.
७ जर तूं करशिल तुच्छ जर ह्या
उपदेशा वा पाहे,
जाण मनीं कीं परमेशाचा
राग तुइयावर आहे.

परमेश्वराची प्रार्थना.

श्लोक

सर्वज्ञा, परमेश्वरा, सकरुणा, बापा, दयासागरा, ॥
आम्ही अज्ञ मुले तुझीं सकळ हीं तूं बाप होशी खरा ॥
केला कां इतका आम्हांवरि तुवां, देवा, असा कोप हा ॥
हें आम्ही करुणस्वरें विनवितों आम्हांकडे तूं पहा ॥

आई थोर तुझे उपकार, ह्या चालीवर.

तू आमुचा आधार । दयाळा, ॥ ध्रु
सत्य स्वरूपा परम पूरुषा ।
आम्ही शरण बहुवार ॥ द० १

स्थूल पसारा कैसा केला ।
आसून तूं निराकार ॥ द० २
विसरून तुजला भुललों जगाला ।
परिदासांतें तार ॥ द० ३
नकळे तुझा अंत कदाही ।
असुनी जवळी तूं फार ॥ द० ४
पातकनाशना, दीन दयाळा ।
भवसिंधू करि पार ॥ द० ५

अभंग.

देवा मला रक्षलेंस.

कित्यक गळाले, कितीएक मेले ॥
परी रक्षीयेलें, देवें मज ॥ १ ॥
कोण मी होतों कीं मजरक्षीयेलें ॥
अनु भवूं दिलें, अस्तित्व हें ॥ २ ॥
देवा कांहीं नोहें, मी तुझ्या समोर ॥
भार भुमीवर असे तुझ्या ॥ ३ ॥
ज्ञांकी माझा गत, वाचें पर्वत ॥
चालवी सतत पुढें मज ॥ ४ ॥
सत्याचें सुबीज, सवत्र पेरीन ॥
नीतिची धरीन, आवड मी ॥ ५
येवो जड भारी, सुभाग्य आभाग्य ॥
होई सर्व योग्य, देवकृपें ॥ ६
जेणे माझें खरें, कल्याण होईल ॥
तेंच हो करील, देव माझा ॥ ७
ह्मणुनिया चिंता दूर मी करीन ॥
भावची धरीन, तयावरी ॥ ८

सु बो ध मा लि नी.

या पुस्तकास ज्या गृहस्थांनीं आपला उदार आश्रय दिला त्यांचीं नांवें.

	प्रती
अ,	
रा. रा अनंत भाऊ	१
,, ,, आनंता आत्मारामजी	१
,, ,, आत्माराम नारायणजी	१
,, ,, आत्मारामजी पांडुरंगजी	१
,, ,, आत्माराम चिंतोबा	२
,, ,, आत्माराम सदोबा	२
ए	
मिस्तर ए. ज्यानअिल	
,, ,, एसू. माणिकजी	
क	
,, ,, के. रघुनाथजी....	१
,, ,, काशीनाथ पांडुरंगजी	१
,, ,, कृष्णराव नाना	१
,, ,, कृष्णराव जगन्नाथजी	१
,, ,, कृष्णराव नारायणजी	१
,, ,, केशवराव माधवरावजी	१
,, ,, कृष्णराव भाईजी	१

ग

,, ,, गणेश नारायण साठे १
,, ,, गणपतराव सदाशिवजी १
,, ,, गोविंद मोरेश्वर डावले १
,, ,, गणपत कृष्णराव. १
,, ,, गणेश विश्वनाथ. १
,, ,, गोविंद आपा. १
,, ,, गजानन मुकुंदजी. ३
,, ,, गजानन नारायणजी. ....

ज

,, ,, जगन्नाथ पांडुरंगजी. १
,, ,, जगन्नाथ रामचंद्रजी. १
,, ,, जगन्नाथ सखारामजी. १
,, ,, जयराम गणेशजी. १
,, ,, जगन्नाथ भास्करजी. १
मिस्तर जेकब आब्राहाम. २
रा. रा. जगन्नाथ बाबुलजी १
,, ,, जगन्नाथ जनार्दन जोशी. १
,, ,, जगन्नाथ भिकाजी. १
,, ,, जी. पी. गायकर १

ड

मिस्तर डेविड हाईम. १
,, ,, डेविड ज्यानीयल्. १

त

रा. रा. त्र्यंबक नारायणजी. १

द

,, ,, द्वारकानाथ रामचंद्रजी १
,, ,, दामोदर मायाराम १
,, ,, दीनानाथजी शीवशंकरजी भींवडीकर ९
,, ,, दीनानाथ पांडुरंगजी. १
,, ,, दीनानाथ भाईजी पोपनीसकर. १

म

,, ,, नारायण रामचंद्रजी शेट १
,, ,, नारायण चिमाजी नाईक १
,, ,, नारायण मुकुंदजी. १
,, ,, नारायण भोवानी गोंधवलेकर १
,, ,, नारायण महादेव १
,, ,, नारायण हरी भागवत. १
,, ,, नारायण बाबुजी समाले. १
,, ,, नानाभाई शंकरजी वाघळें. १
,, ,, नाना भाईजी. १
,, ,, नाना गोविंदराव. १
,, ,, नानाभाई शंकरजी. १
,, ,, नारायण शिवबा. १
,, ,, नारायण लक्षुमणजी सबनीस. १

प

,, ,, पुतळाजी नारायणजी. १
,, ,, पांडुरंग बाळकृष्णा चाचड. १
,, ,, परशराम आपा. १
,, ,, परशराम कुशाबा. १

फ

रा. रा. फत्तु काशीनाथ. १

ब

,, ,, बाळकृष्ण वासुदेवजी १
,, ,, बाळकृष्ण रामशेट. १
,, ,, बापुजी माधवराव. १
,, ,, बाळकृष्ण नारायणजी. १
,, ,, बाळकृष्ण आनंदराव. १
,, ,, बाळकृष्ण नारायणजी भीशी. १
,, ,, बाबुराव बाळेराव. १
,, ,, बळवंतराव बाळकृष्ण मेणेंकर. १

भ

,, ,, भगवंतराव सदाशिवजी. १
,, ,, भास्कर बाळकृष्ण. १
,, ,, भगवंतराव वासुदेवजी शेवरे. १
,, ,, भाईजी गोविंदजी. १
,, ,, भिकोबा बचोबा काटवी. १
,, ,, भाई सुंदरजी. १
,, ,, भास्कर बाबुलजी. १

म

,, ,, माधवराव भास्करराव साणे. १
,, ,, मोरेश्वर. डब्ल्यु. कर्तिकर. १
,, ,, महादेव गंगाधर जोशी. १
,, ,, माधवराव राघोबा. १
,, ,, माधवराव यशवंतराव. १
,, ,, माधवराव नारायणजी. १
,, ,, मोरेश्वर हरिश्चंद्रजी. १
,, ,, माणिकजी धोंडबा. १

य

,, ,, येसोबा दादाजी. १
,, ,, यशवंत जयराम. १

र

,, ,, राजाराम खंडेराव. १
,, ,, रघुनाथ. जी. १
,, ,, रावशी काशीबा. १
,, ,, रघुनाथजी आनंदरावजी रेळे. १
रा० रा० रामचंद्र भाई रजपुतकर. १

ल

,, ,, लालदास दामोदरदास. १
,, ,, लक्षुमण दवलतराव. १

व

,, ,, विनायक. डी. १
,, ,, वासुदेव रामचंद्रजी. १
,, ,, विठ्ठल वामनराव ढमे. १
,, ,, वामनराव भाईजी माहीमकर. १
,, ,, विनायक अनंदरावजी. १
,, ,, वामन गजाननजी. १
,, ,, विठोबा कृष्णराव. १
,, ,, विनायक भाऊजी. १
,, ,, विनायक दामोदरजी. २
,, ,, व्यंकटेश गोविंद थत्ते. १
,, ,, विनायकराव आर. १
,, ,, विनायक नारायणजी. ३
,, ,, विनायकराव बापुजी. १

श

,, ,, शामराव माणिकजी. १
,, ,, शिवराम गोपाळ. १
,, ,, शिवराम रामचंद्रजी शिरढोनकर. १
,, ,, शिवराम विठोबा मंगले. १
,, ,, शिवशंकर नारायणजी. १

स

,, ,, सदानंद श्रीकृष्णाजी. १
,, ,, सदाशिव विठ्ठल. १
,, ,, सुंदरराव दामोदरजी. १
,, ,, सदानंद लक्ष्मणजी. १

श्री

,, ,, श्रीकृष्ण वासुदेवजी. १